## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४१**

MAHMAR 19758/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ९ / डिसेंबर २०००

## संपादकीय

### बदल - वेग आणि आवेग

गेल्या पंचवीस वर्षांत जग आमूलाग्र बदललं. लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या कोताऱ्यांपर्यंत सर्व माणसांना या बदलाचा वेग जाणवतो आहे. प्रत्येकाची जीवनाबद्दलची, जीवनाच्या श्रेयसाबद्दलची जाणीव बदलली. एकेकाळी आदर्श मानली गेलेली कित्येक मूल्ये पार विसरली तरी गेली किंवा बाराच्या भावात निकालात तरी निघाली. बदल अपरिहार्य असतो. तुम्ही तक्रार करा, करू नका, स्वच्छेने हे बदल स्वीकारा की स्वीकारू नका, व्यक्ती म्हणून तुमच्या मर्जीला किंमत शून्य असते. एका सुंदर प्रार्थनेत एक ओळ वाचली होती, 'हे परमेश्वरा, जी परिस्थिती मी बदलू शकत नाही, तिला सामोरे जाण्याचे मला धैर्य दे.' परिस्थितीच्या रंगरूपातले हे बदल अपरिहार्य असतात, ते स्वीकारावेच लागतात. डार्विनचा सिद्धान्त म्हणूनच महत्त्वाचा आहे. 'जे लायक असतात तेच जगू शकतात.' जगण्याच्या स्पर्धेत हे बदल स्वीकारून जे लायक ठरतात तेच जगतात. ज्यांना हे बदल अगम्य असतात, जे हे स्वीकारण्या लायक ठरत नाहीत ते श्वासाचं अंतर पार करून मरण पावतात.

बदल हा सृष्टीचा, निसर्गाचा नियम आहे. क्षितिज तेच असतं, सूर्यही तोच असतो तरी रोजचा सूर्योदय नवा असतो, वेगळा, बदललेला असतो. बालकवींची औदुंबर लहान वयात वाचतांना निसर्गचित्र असते, पण पौढ वयात त्यातील भावार्थाला तत्त्वज्ञानाचे अर्थ फुटतात. निसर्गनियमानुसार आपण बदलत गेलेलो असतो.

बदल चांगले की वाईट हे कसं ठरवायचं? पहाणाऱ्याच्या दृष्टिकोनाचा प्रश्न असतो. सामाजिक संदर्भात त्या बदलांची किंमत चुकवावी लागत असते, परिणाम भोगावे लागत असतात. १९८० च्या सुमारास चीन मध्ये 'एक कुटुंब एक मूल' या धोरणाचा पुरस्कार करण्यात आला. मुलगा असणे हे चांगले असे समजणाऱ्या चीनी संस्कृतीत याचा स्वाभाविक परिणाम गर्भजल चिकित्सा करून स्त्रीलिंगी गर्भ नाहीसा करण्यात झाला. परिणामत: समाजशास्त्रीय पाहणीत आज वीस वर्षांनंतर चीनमध्ये वेश्या व्यवसायाचे प्रमाण वाढले असल्याचे लक्षात आले. या उदाहरणात बदल चांगला असं कसं म्हणणार ?

असाच एक बदल म्हणजे पैशांविषयींच्या जाणीवांमधला. आज पैसा या बाबींकडे ज्या दृष्टीने पाहिले जाते, ज्या सहजतेने पैशाचा वापर किंवा गैरवापर केला जातो त्यामुळे सर्व सामाजिक बदलांमध्ये प्रचंड गती आली आहे. एकेकाळी 'ऋण काढून सण नको' हे मूल्य समाज मानत होता. असेल त्या पैशात समाधान मानण्याची दृष्टी

होती. पण आता या जाणीवा प्रचंड बदलल्या.जास्तीत जास्त किंवा जास्तीत जास्त ठिकाणांहून लोन कसं काढता येईल याचाच आज विचार केला जातो. माझ्या एका बँकेतल्या मित्राने तर 'हप्ते वेळच्या वेळी काय फेडतोस....? पैसा वापरायचा असतो. हप्त्यांमध्ये जितकी दिरंगाई करता येईल तेवढी कर' असा आर्थिक सल्ला मला दिला होता. दुसऱ्याचा पैसा कसा वापरता येईल, कसा बुडवता येईल ही आजची संस्कृती आहे. हा बदल चांगला की वाईट हा प्रश्नच नाही, त्याला सामोरे जावेच लागते.

आर्थिक जाणीवा अशा बदलल्या या पार्श्वभूमीवर चारा घोटाळा, हर्षद मेहता प्रकरण, बोफोर्स प्रकरण हे सर्व घडायला लागलं. गांधींच्या स्वप्नातला भारत हा विषय कधीच कालबाह्य झाला. सर्वसामान्य माणसाकडेही अमाप पैसा यायला लागला. समाजशास्त्रीय मीमांसेनुसार समाजात असा पैसा जेव्हा येतो तेव्हा व्यसनाधीनता पराकोटीची वाढते. गुजरातमध्ये दारूबंदी लागू केली होती. त्याचे पुढे काय झाले? पंचवीस तीस वर्षांत खेडोपाडी आणि गल्लोगल्ली बार निर्माण झाले. महाविद्यालयातील तरुण मुलेही सहज जाऊन 'बीअर मारून' येतात. वर अमेरिकेत हे असं आहे असं समर्थनही करतात. अमेरिकेसारख्या देशांमधील व्यसनाधीनतेचे अनुकरण आम्हाला सहज शक्य होत आहे याचं एकमेव कारण पैसा!

त्यातून सर्वांना ज्यांनी भारून टाकले आहे त्या 'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमाचा वाढता महिमा आज लक्षात येणार नाही, पण पुढील पाच सात वर्षातील अनेक आर्थिक बदल, या कार्यक्रमामुळे निर्माण होतील. 'महिनाभर खर्डेघाशी (!) करून दहाच (?) हजार रुपये मिळणार, त्यापेक्षा हे कसं आपलं सोपं काही नाही तर लखपती तरी होता येईल' असा आशावाद सामान्य माणसाच्या मनात रुजवून त्याला जुगाराचे आकर्षण वाटेल, तो जुगाराला प्रवृत्त होईल ही या कार्यक्रमाची फलनिष्पत्ती. रोज लक्षावधी माणसे आपला नंबर लागावा म्हणून सतत या कार्यक्रमासाठी फोन करीत असतात. यातील सामान्य ज्ञानाचे आव्हान महत्त्वाचे वाटतच नाही (अर्थात इतके तकलुपी प्रश्न असतात की खरोखर अभ्यास करणाऱ्यास ते आव्हान वाटणारच नाही.) आव्हान वाटते ती शिडी पार करण्याचे. अमिताभच्या बरोबर बसण्याचे. इतक्या पैशांचे तुम्ही काय करणार? या प्रश्नाला बहुतेक जणांची उत्तरे 'ऐश करणार' अशा चालीवर असतात. कोणत्यातरी सुमार नटीबरोबर परदेश दौरा करणार. परदेशात जाणार, धंदा करणार .... यापलीकडे पैशाच्या सहाय्याने करता येईल असं काही नाहीच का? कोणत्यातरी एका स्पर्धकाने पूरग्रस्तांना हे पैसे देणार असे उदात्त तत्त्वज्ञान व्यक्त केले. प्रत्यक्षात काय केले ते तो स्पर्धक व अमिताभच जाणो!

पैसा मिळविण्याची इच्छा असणे गैर नाही. झटपट श्रीमंत होऊन जगातील सर्व भोग एका क्षणात भोगण्याचा हव्यास मात्र वाईट. लॉटरी किंवा हा कार्यक्रम यातून समाजाला दिला जाणारा संदेश, सामान्यांच्या मनात पेरली जाणारी स्वप्ने म्हणूनच गैर वाटतात. एकदा पैशांविषयीच्या जाणीवा बदलल्या की मानवी नातेसंबंधांचे अर्थही बदलतात. आईवडिलांना सहजपणे वृद्धाश्रमात हाकलले जाते. पैशाची नशा अशी असते की सख्खे, चुलत तर सोडाच, माणसाशी असणारे माणसाचे नाते सुद्धा बदलते.

बदल आणि बदलांचा वेग यांचा जसजसा विचार करावा तसं तसं खूप काही जाणवत रहातं. माणसाच्या मनाचं कोडं अधिकच अनाकलनीय होत रहातं. तरीही बदल होतच रहाणार. इंटरनेट, इ बँकिंग व ई कॉमर्स यांच्यामुळे तर पुढील पाच दहा वर्षात होत्याचं नव्हतं होणार हे अपरिहार्य आहे! पुढील सहस्त्रकातील प्रवेशाचं चित्र हे असं आहे !!

पंजीकरण झाल्यानंतर 'व्ही. पी. एम्. दिशा' या नावाने आता हे नियतकालिक निघेल. त्यानंतरचा हा पहिला अंक म्हणून वर्ष एक अंक एक असे म्हटले आहे.

**अचलकुमार टिळू**
संपादक

***

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक १ / डिसेंबर २०००

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. मनाली देवरूकर
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेशीर सल्लागार**
ॲड. सलील चुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | |
| २) | गीता - जीवन मार्गदर्शक ग्रंथ | श्री. अ. वि. सहस्रबुद्धे | २ |
| ३) | कोसला आणि आजची युवा पिढी | शिल्पा पाटील | ४ |
| ४) | कै. नी. गो. पंडितराव स्मृती वक्तृत्व स्पर्धा वर्ष ३२ वे | श्री. रवींद्र पांडुरंग दातार | ६ |
| ५) | वजावाकीतून समृद्धी | शैला जोगळेकर | ८ |
| ६) | दरवळणारा सुगंध - टी. चंद्रशेखर | श्री. अजित पेंढरकर | ११ |
| ७) | पंचेचाळीस हजाराचा जीव | प्रा. प्रदीप कर्णिक | १३ |
| ८) | लॉलंडस - पुस्तक परिचय | श्री. चिंतामणीभिडे | १८ |
| ९) | समर्थ रामदास (उत्तरार्ध) | सौ. मीरा लिमये | २० |
| १०) | इंद्रधनुष्य आणि सोन्याचा हंडा | लीला जोशी | २४ |
| ११) | भ्रष्टाचार | सौ. वंदना सं. प्रसादे | २७ |
| १२) | आठवणीत राहिलेले सर | प्रा. मोहन पाठक | २९ |
| १३) | व्यंगचित्र काय असतं | श्री. संजय रुळे | ३१ |
| १३) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्या प्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही

**परोपकार करणारे संत पुरुष फळाची अपेक्षा ठेवत नाहीत.**

# गीता - जीवन मार्गदर्शक ग्रंथ

**श्री. अ. वि. सहस्रबुद्धे**

*७ डिसेंबर रोजी गीता जयंती आहे. या दिवसानिमित्त हा लेख देत आहोत. - संपादक*

१९३२ साली धुळ्याच्या जेलमधे अनेक संत, महंत आणि सेवक गोळा झाले होते. त्यात सर्वश्रेष्ठ संत होते 'विनोबा भावे'. या जेलमधे विनोबांनी गीता प्रवचने करताना श्रीमद्भगवद्गीतेविषयी मांडलेले विचार मननीय आहेत. विनोबा म्हणतात, 'गीतेचा व माझा संबंध तर्कापलीकडचा आहे. माझे शरीर आईच्या दुधावर पोसले त्यापेक्षाही माझे हृदय व बुद्धी यांचे गीतेच्या दुधावर अधिक पोषण झाले आहे. तर्काला छाटून श्रद्धा व प्रयोग या दोन पंखांनीच गीतेच्या गगनात मी यथाशक्ती भराऱ्या मारीत असतो.'

गीता हा लहानसाच पण हिंदुधर्माचा मुख्य ग्रंथ मानला जातो कारण समग्र महाभारताचे नवनीत व्यासांनी भगवद्गीतेत दिले आहे. प्राचीन काळापासून गीतेला उपनिषद ही पदवी मिळाली आहे. गीता उपनिषदाचेही उपनिषद आहे कारण सर्व उपनिषदांचे दहन करून हे गीतारूपी दूध भगवंतांनी अर्जुनाच्या निमित्ताने जगाला दिले आहे. जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्राय: प्रत्येक विचार गीतेत येऊन गेला आहे. म्हणूनच गीता धर्मज्ञानाचा कोश आहे.

गीतेचा जन्म, स्वधर्माच्या आड येणारा जो मोह, त्या निवारणार्थ आहे. अर्जुन धर्म संमूढ झाला होता. स्वधर्माच्या (कर्तव्याच्या)बाबतीत त्याला मोह पडला होता. तो मोह, ते ममत्व, ती आसक्ती दूर करणे हे गीतेचे मुख्य काम. म्हणूनच संपूर्ण गीता ऐकल्यानंतर अर्जुन म्हणतो, 'देवा, मोह मेला. स्वधर्माचे (कर्तव्याचे) भान झाले.' थोडक्यात गीतेचा उपक्रम आणि उपसंहार जुळवून पाहिल्यास मोह निवारण हेच फलित निघते. व्यासांनी महाभारताच्या आरंभीच म्हटले आहे की लोकांच्या हृदयातील मोहावरण घालविण्यासाठी मी हा इतिहास प्रदीप पेटवीत आहे.

गीतेचे अंतरंग सोप्या भाषेत जाणून घेण्यासाठी या ग्रंथाची पुढीलप्रमाणे विभागणी करणे योग्य ठरेल. अध्याय १ ते ६ मधे सांख्य आणि योग तत्त्वांची तुलना आहे. योग ही मनोवृत्ती आणि जीवनदृष्टी आहे. सर्वकाळ समतोल, शांत मन ठेवणे आणि त्या करिता विकारांवर तावा मिळविणे हा योगाचा मुख्य आशय आहे. योग साधण्याकरिता ज्ञान, ध्यान आणि कर्म अशी तीन साधने सांगितली आहेत आणि त्याच्या तत्वाचे विवरण केले आहे. ज्ञान, कर्म, ध्यानाने साधलेली योगवृत्ती ही ऐहिक जीवनातील कर्मयोगाला उपयोगी पडते त्याचप्रमाणे ती मुक्ती करिता किंवा ईश्वरप्राप्तीकरिताही उपयोगी पडते.

अध्याय ७ ते १२ यात सगुण, भक्तिप्रधान, अद्वैत वेदान्त आहे. भक्तीने आपली सर्व कर्मे ईशास अर्पण करावीत, त्याला शरण जावे, म्हणजे ईश्वराचे सतत ध्यान व चिंतन करून जीवन ईश्वरमय करावे. त्यामुळे योगवृत्ती साध्य होते व मनाला शांती मिळते.

अध्याय १३ ते १५ मधील विषयात पंचभूतात्मक सृष्टी आणि देह, जीवात्मा व परमात्मा यांचे संबंध विषद केले आहेत.

अध्याय १६ ते १८ मध्ये मानवी स्वभावात, बुद्धीत व आचरणात स्वाभाविक विविधता व बरे वाईटपणा कसा आहे ते सांगून गीतेच्या तत्त्वज्ञानाचा जीवनात कसा उपयोग होतो हे दाखविले आहे. योग तत्त्वज्ञानाच्या आधाराने दैवी व सात्त्विक जीवन जगता येते. उलट त्याच्या उल्लंघनामुळे

आसुरी, राजस व तामस असे स्वरूप जीवनाला येते.

परमार्थ, गीता वगैरे ग्रंथ साधूंसाठीच आहेत अशी एक भ्रामक कल्पना कित्येक लोकांची झाली आहे. या कल्पनेमुळे साधुसंत व व्यावहारिक लोक वेगवेगळे केले आहेत. गीतारहस्यात टिळकांनी या गोष्टीकडे लक्ष वेधून घेतले आहे. गीता हा ग्रंथ सर्वसाधारण व्यावहारिक लोकांसाठी आहे, ही टिळकांची भूमिका आहे. आपला व्यवहार शुद्ध व निर्मळ होऊन मनाचे समाधान व शांती कशी लाभावी हे गीता शिकवते.

व्यवहार असो वा परमार्थ, त्यात चित्ताची एकाग्रता असल्याशिवाय यश मिळवणे कठीण आहे. चित्त जर एकाग्र होईल तर मात्र सामर्थ्य कधीही कमी पडणार नाही हा महत्त्वाचा संदेश गीता सर्वांना देते.

सर्वसामान्य माणसाला गीतेचा अर्थ लक्षात यावा म्हणून स्वामी स्वरूपानंदांनी 'भावार्थ गीता' नामक गीतेचा साकीवृत्तात अनुवाद केला आहे. त्यातील काही श्लोकावरून गीता समजणे किती सोपे आहे हे कळावे म्हणून ते पुढे देत आहे.

१. स्व-जन वध नको राज्य सुख नको भले त्याहुनी मरण
जाण अच्युता यातचि माझे दिसे परम कल्याण

२. अंगावरती जरि कोसळती डोंगरही दुःखाचे
असे अढळ मन सदा जयाचे नाव न उद्वेगाचे
आणि सुखाची हाव जयाच्या नाही अंतःकरणा
संग रहित निर्भय अक्रोधी स्थितप्रज्ञ तो मौनी
तरी नित्य तू निःसंगपणे निज कर्तव्य करावे
कर्म करुनी अलिप्त जर तो कैवल्य पदा पावे
नसे अपेक्षा फली जयाची सकलही कर्मे करिता
'मी कर्ता, हे करीन' न शिवे संकल्प असा चित्ता
असे मनाचे एक भले की लागेल जिथे गोडी
तिथे रंगते सुस्थिर होते मुळी न ते स्थळ सोडी
पुनरपि जननं, पुनरपि मरणम् भवचक्र असे फिरते
तयां न चुकते आणि जिणे ते लाजिरवाणे होते
मज अवलोका तुवां चि डोळा दाखविले हे रूप
सौख्य सोहळा असा भोगिला झाला तोष अमाप
अहं भावना लुप्त जाहली ज्याची बुद्धि अलिप्त
तो विश्व वधी तरी न व वधी तो संसारी मुक्त

आज लोकशाहीतील सर्व आपण अनुभवीत आहोत. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय ऐक्य, सामंजस्य, विश्वबंधुत्व इ. राष्ट्रीय मूल्ये आपल्यासमोर आहेत. शाळेतही मूल्यशिक्षण आले आहे. हे सगळं निकोप सुदृढ आणि सशक्त करायच असेल तर लक्षात हवे 'अद्वेष्टा सर्व भूतानां। परस्परांवर प्रेम करू। शेजाऱ्यांवर प्रेम करू। शत्रूवरती प्रेम करू' हे सूत्र आचरणात यायला पाहिजे. प्रतिज्ञतापूर्वक प्रेम करण्याच वचन घेतलं पाहिजे. निष्पाप, निष्काम, निर्व्याज, निर्मल. तरच आपली भक्ती खरी, आपली लोकशाही, संभाषण स्वातंत्र्य, समता, बंधुता इ. खरे.

गीता पठनाने तुमची वाणी शुद्ध होईल. गीता विचाराने तुमच्या व्यक्तिमत्त्वाला वळण लागेल. गीतेच्या चिंतनाने आयुष्य कसे जगावे याचा मार्ग सापडेल. रोज एक गीता श्लोक पाठ करा, वाचा, अर्थ समजावून घ्या व जीवनाचा विकास साधा. गीता पठण रोज हवं, केवळ गीता जयंतीला नको. गीता तुम्हा सर्वांना सन्मार्ग दाखवो हीच सदिच्छा!

**श्री. अ. वि. सहस्रबुद्धे**
माजी मुख्याध्यापक
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)
ठाणे - ४०० ६०२

***

# कोसला आणि आजची युवा पिढी

शिल्पा पाटील

*मराठीतील उत्कृष्ट मानली जाणारी कादंबरी कोसला. कोसलाने त्यावेळेला मराठी साहित्यात एक टप्पा निर्माण केला होता. आज ही कादंबरी वाचताना महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांस काय वाटते ----- त्या दृष्टीने हा छोटा शोध ! - संपादक*

'भालचंद्र नेमाडे या लेखकाने कोसला ही कादंबरी लिहून मराठीतील कादंबरीच्या साचेबंदपणाला धडक दिली व ही कादंबरी कोणते नवे वळण, आशय व अभिव्यक्तीच्या नाविन्यातून व वास्तवातून होऊ शकते हे तिने दाखविले आहे.' (सारस्वत, दीपावली)

तसेच थोर आनंदमूर्ती पु. ल. देशपांडे हे इचलकरंजी येथील साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते, "ह्या नव्या लेखकाने आमच्या पिढीला असंच डुलक्या घेतांना पकडले."

मित्रहो, भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही शंभरातील नव्व्याण्णवांस सादर केलेली कादंबरी उत्कृष्ट आहे. आकलनाच्या दृष्टीने पाहिल्यास तिला अनेक पैलू आहेत. परंतु माझ्यासारख्या महाविद्यालयीन जीवन जगणाऱ्या विद्यार्थिनीला मात्र लेखकाने अनुभवलेले महाविद्यालयीन जीवन आणि आम्ही अनुभवत असलेले महाविद्यालयीन जीवन याविषयी काही लिहावेसे वाटते.

शालेय जीवन संपल्यानंतर येणाऱ्या महाविद्यालयीन जीवनाची ओढ प्रत्येकालाच असते आणि अशीच ओढ लेखकाच्या बाबतीतही दिसून येते. मात्र आजच्यासारखा शिक्षणाचा प्रसार झाला नसल्याने खेडोपाडी महाविद्यालये नव्हती. तेव्हा महाविद्यायीन शिक्षणासाठी लेखकाला पुण्याला जावे लागले, सहाजिकच हॉस्टेलचे जीवनही जगावे लागले.

आजकाल कोणत्याही कॉलेजचा पहिला दिवस हा रॅगिंगने सुरू होतो. परंतु लेखकाच्या काळात मात्र तसे नव्हते या उलट, मुख्याध्यापक, 'तुम्ही या शाखेत प्रवेश का घेतला? तुम्हाला पुढे काय करायचे आहे?' हे विचारायचे. एकंदरित ही स्वतःच्या व्यक्तिमत्वाची छोटीशी ओळख असायची. पण आज मात्र सीनीयर विद्यार्थीच शिक्षक बनून वर्गात जातात. एखादा तास वगैरे घेतात आणि नवीन विद्यार्थ्यांची फजिती करतात. हे झाले काहीसा सौम्य स्वरूपाचे रॅगिंग. पण हे रॅगिंग जेव्हा सौम्य प्रकारचे न राहाता विध्वंसक प्रवृत्तीकडे वळताना दिसते तेव्हा मात्र आत्महत्या घडतात. तेव्हा रॅगिंग असावं की नसावं हा महाविद्यालयीन जीवनाचा मोठा प्रश्न होतो.

त्यानंतर महाविद्यालयाची एखादी वर्षासहल वगैरे. या वर्षासहलीचे नाविन्य आजही टिकून आहे. आजची पिढी मात्र काही वेळेला या वर्षासहलींना जाऊन पर्यावरणाचा ऱ्हास करताना दिसते. याविरूद्ध लेखकाची पिढी पाहिल्यास पर्यावरणाचे जतन करताना दिसते.

मग सुरू होतात ते महाविद्यालयीन जीवनातले डेज्. 'हे' आज एक फॅड झालेत. त्यांची गरज किती? आणि किती नाही याचा विचार करायला कोणालाही वेळ नाही. अंधानुकरणाची संस्कृती बोकाळतेय. या सर्वांबरोबर कॉलेजमधल्या पार्ट्या, निवडणुका, फॅशन शोज्, परसनालीटी कॉन्टेस्ट या सारखे कार्यक्रम व्यापारीकरणाचा प्रसार करतायत. परंतु लेखकाच्या महाविद्यालयात कधीत

कमी पैशात दर्जेदार कार्यक्रम करण्याचीही स्पर्धा होती. आजच्या महाविद्यालयीन जीवनाचा सगळ्यात मोठा बदल म्हणजे कमीत कमी कपडे जास्तीत जास्त तोकडे करून घालणे.

तसेच शिक्षकांना अरे - तुरे म्हणण्याची फॅशन आहे. तर लेखकाच्या काळात मात्र कॉलेजमधील विद्यार्थ्यांनाही आहो-जाहो म्हणण्याची पद्धत होती. तसेच लेक्चर्सला न बसणे, बसले तरी शिकवण्याकडे लक्ष न देणे, टवाळक्या करणे, अगदीच काही नाही तर झोपणे हे दिसून येते. या गोष्टी लेखकाच्या महाविद्यालयीन जीवनातही दिसून आल्या, पण फार कमी प्रमाणात. विचार केला तर आजचे शिक्षकही आपल्या कर्तव्यांपासून दूर पळताना दिसतात. त्याला कारणेही अनेक आहेत!

आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट असे कोचिंग क्लासेस उपलब्ध आहेत. त्यामुळे स्वतःच्या नोटस् तयार करण्याचा प्रश्न नाही. त्यामुळे ग्रंथालयात जाण्याचाही प्रश्न नाही. म्हणूनच लेखक ज्या ग्रंथलयांना पुस्तकांचे देऊळ मानतो ती आज कालबाह्य होतांना दिसताहेत. आजचा जमानाच जणू रेडीमेडचा झालाय.

मित्रहो, महाविद्यालयीन जीवन म्हणजे वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, एकांकिका स्पर्धा यांची रेलचेल, आजचं चित्र मात्र बदललय. या स्पर्धांचा प्रतिसाद फार अल्प झालाय. यामुळे होतंय काय की सर्वांगाने बहरणारी व्यक्तिमत्त्वं घडतच नाहीत. तयार होतंय ते कारखान्यातल्या मालासारखे, वॉरंटीसह तात्पुरते. आणि म्हणूनच कोसलासारखी एखादी कादंबरी या इंटरनेटच्या जगात कधी तरी लिहिली जाईल का याविषयी मन साशंक आहे.

या सर्व झाल्या काळ्या बाजू, पण पांढरी बाजूही असतेच. Every cloud has Silver Lining. आजही नम्रता, सद्सद्विवेकबुद्धी, नीतीमत्ता या गोष्टी दिसून येतात. त्यांचे प्रमाण मात्र अत्यल्प आहे. जणू शंभरात एक वगैरे. परंतु शंभरातला एक माणूस, हजारात - दहा आणि दहा हजारात - शंभर. तेव्हा ही शंभर माणसे, दहा हजार माणसे नक्कीच बदलू शकतात. आणि याच आशेवर पुढच्या पिढीच्या उज्वल भविष्याची स्वप्न आपण पाहू शकतो.

**शिल्पा पाटील**
तृतीय वर्ष विज्ञान,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे - ४०० ६०१.

***

With Best Compliment From

Mr. R.R. Subramanyam
&
Sons

# कै. नी. गो. पंडितराव स्मृती वक्तृत्व स्पर्धा वर्ष ३२ वे

**श्री. रवींद्र पांडुरंग दातार**

*महाराष्ट्रातील प्रसिद्ध महाविद्यालयीन वक्तृत स्पर्धा 'कै. नी. गो. पंडितराव स्मृती वक्तृत्व स्पर्धे'चे एक कार्यकर्ता, स्पर्धक आणि श्रोता या दृष्टिकोनातून आलेले अनुभव. - संपादक*

महाराष्ट्राच्या महाविद्यालयीन जीवनातील एक प्रमुख घटक म्हणजे वक्तृत्व स्पर्धा. अनेक ठिकाणी अशा स्पर्धा मोठ्या जोमात सुरु होतात आणि काही वेळा त्या बंदही पडतात. पण ज्या काही स्पर्धा सतत सुरू आहेत त्यापैकी एक मानाचे नाव म्हणजे कै. नी. गो. पंडितराव स्मृती वक्तृत्व स्पर्धा. यंदा या स्पर्धेचे ३२ वे वर्ष. त्या निमित्ताने या वर्षीच्या स्पर्धेविषयी एक कार्यकर्ता, माजी स्पर्धक आणि प्रेक्षक म्हणून मला जाणवलेल्या काही गोष्टी, भावना मी मांडत आहे.

पदवी गट आणि कनिष्ठ महाविद्यालयीन गट अशा दोन विभागात या स्पर्धा घेतल्या जातात. नियोजित विषय आणि उत्स्फुर्त विषय अशा दोन गटात या स्पर्धा संपन्न झाल्या. विषयांचे वैविध्य आणि त्या अनुषंगाने स्पर्धकांनी मांडलेले विचार या विषयी बोलावयाचे झाले तर एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या गोष्टी आणि स्पर्धा कालावधीच्या वेळी घडत असलेल्या घटना. सतत चर्चेत असणाऱ्या गोष्टी या विषयीच स्पर्धक प्रामुख्याने बोलतात. याचे उदाहरण म्हणजे या वर्षीचे काही ठळक विषय १) शिक्षण क्षेत्रातील माफिया २) एकतर्फी प्रेम ३) पहिलीपासून इंग्रजी शिक्षण आणि ४) वाढती व्यसनाधिनता या विषयांवरच स्पर्धक प्रामुख्याने बोलले. याचे एक कारण मला असे वाटते की स्पर्धकांना विशेष मेहनत घ्यावी लागत नाही. वृत्तपत्रांमध्ये याविषयी सतत काही ना काही येत असते. सर्व संदर्भ सहजगत्या उपलब्ध असतात त्यामुळे विशेष अभ्यास केला जात नाही. वास्तविक या स्पर्धा भरविण्यामागे जो प्रमुख हेतू आहे की निदान या निमित्ताने तरी विद्यार्थ्यांनी वेगळे विषय अभ्यासावेत, त्या विषयी वाचन करावे हा मुख्य हेतू आहे पण तो कुठेतरी नाहिसा होत आहे. अर्थात फास्ट फुडच्या या जमान्यात त्यानाही सर्व गोष्टी फास्ट हव्या आहेत. विशेष मेहनत करायला नको आहे. पण हे सर्व सहजगत्या उपलब्ध असूनही विद्यार्थी कुठेतरी कमी पडतात. कदाचित त्यांना अस वाटत की यात काय बोलायच आहे आपण सहज बोलू पण नेमकी हीच गोष्ट आड येते आणि विद्यार्थी चुका करतात. ठराविक चाकोरीबद्ध रितीने विषय मांडला जातो, तेच तेच संदर्भ दिले जातात. वास्तविक वेगळ्या दृष्टीनी त्या घटनांकडे विद्यार्थ्यांनी बघाव आणि त्यावर भाष्य कराव अशी अपेक्षा असते. याउलट असेही काही विषय होते ज्यावर खूप काही बोलण्यासारख होत. उदा. १) स्वायत्तता घटक राज्यांची २) ललित साहित्य-बदलते संदर्भ ३) एक अल्जावा भारतीय आणि ४) ग्रंथालये कालबाह्य होत आहेत. पण या विषयांवर मोजकेच स्पर्धक बोलले. मला अस वाटत की हे विषय खरोखरच अभ्यास करण्याच्या दृष्टीचे होते. पण मघाशी म्हटल्याप्रमाणे याचे संदर्भ सहज उपलब्ध होणारे नव्हते. त्याकरता विशेष मेहनत घेणे आवश्यक होते. स्पर्धकांनी या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

एकंदर या वर्षीची स्पर्धा बघताना अस लक्षात आलं

---

जे हृदयात सतत सलत रहाते, खटकत रहाते, त्याचेच नाव पाप होय.

की विद्यार्थ्यांच वाचन खूप कमी आहे. आणि वाचन कमी असल्याने त्यांच्याकडून मुलभूत चुका होतात. अनेक लेखकांच्या नावावर त्यांनी न लिहीलेले लेखन संदर्भ खपविले जातात, हे टाळण जरुरीचे आहे. ग्रंथालये कालबाह्य होत आहेत या विषयावर कोणीही बोलले नाही यावरुन हेच सिद्ध होते की ग्रंथालये खरोखरच कालबाह्य होत आहेत. म्हणजेच पर्यायाने वाचन संस्कृतीच नाहीशी होत आहे. वाचन कमी असण्याचा जो अनुभव येतो ती उत्स्फुर्त स्पर्धेमध्ये. या स्पर्धेतच विद्यार्थ्यांची खरी कसोटी लागते. म्हणूनच वाचन वाढविणे अत्यंत जरूरी आहे. या स्पर्धेत तर कित्येक वेळा अस लक्षात येत की विद्यार्थ्यांना जो विषय आला होता तो कळलाच नव्हता. त्यामुळे अनेकांना विषय मांडताच आला नाही किंवा काही जण माईक हातात आहे आणि तीन मिनिटे बोलावयाचे आहे म्हणून उगाचच काहीतरी बोलले. या स्पर्धेकरता वाचन, निरिक्षण या बाबी अत्यंत आवश्यक आहेत आणि जर स्पर्धेत चमकायचे असेल तर हे आत्मसात केले पाहिजे. त्याचबरोबर कित्येकवेळा असही लक्षात येते की केवळ प्राध्यापक सांगतात म्हणून विद्यार्थी भाग घेतात आणि कुठल्यातरी विषयावर बोलतात. पण खरोखर त्यांना तो विषय कळला आहे का असे प्रश्न पडतात. त्यामुळे मग बोलण्यात सुसूत्रता नसते, मुद्दे कमी पडतात या गोष्टी ठळकपणे लक्षांत येतात. तेव्हा प्राध्यापकांनीसुद्धा जर या गोष्टींकडे लक्ष दिले तर कदाचित खुप फरक पडू शकेल.

या सर्व बाबींबरोबर विद्यार्थ्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे वक्तृत्व ही कला आहे. केवळ चार लोकांसमोर बोलता आले म्हणजे वक्तृत्व हा चुकीचा गैरसमज आहे. आपली व्यक्तीमत्त्व, आवाज या सर्वांची सांगड घालता आली पाहिजे. आपण कसे उभे राहतो, हावभाव कसे करतो आणि मुख्य म्हणजे वेळेच भान असण या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. या सर्व गोष्टी मार्कांकरता लक्षात घेतल्या जातात. अर्थात या गोष्टींचा अभाव कमी अधिक प्रमाणात या स्पर्धेतसुद्धा आढळला. अनेक विद्यार्थी खूप भराभर बोलत होते किंवा निवडणूकीचा प्रचार असल्यागत तावातावानी बोलत होते. तरीही यात अनेक असेही होते जे अत्यंत सुंदर आणि मुद्देसुद बोलले. त्यांचे वाचन, अभ्यास, निरिक्षण या सर्व गोष्टी वाखाणण्यासारख्या होत्या. अर्थात एक गोष्ट मात्र मान्य केली पाहिजे की स्पर्धकांमध्ये आत्मविश्वास आणि सभाधीटपणा हा मात्र कौतुकास्पद आहे. स्पर्धक बिनधास्त आणि मोकळेपणांनी बोलत होते. त्यामुळे नकळत आमच मन सुद्धा कॉलेजच्या दिवसात जात होत. यावर्षीचे परिक्षक सुद्धा अत्यंत तोलामोलाचे होते. त्यांनी जे परिक्षण आणि नंतर मनोगत व्यक्त केले त्यामधुन त्यांनी परखड पण अत्यंत उपयुक्त अस मार्गदर्शन स्पर्धकांना केले.

खर म्हणजे या आमच्या स्पर्धेविषयी लिहिण्यासारख खुप काही आहे. आमचे प्रा. पाठक सर म्हणतात त्याप्रमाणे ही स्पर्धा म्हणजे दीड दिवसाचा गणपती असतो. गणपतीसाठी जशी महिना-दीड महिना आधी तयारी चालू असते तशीच तयारी प्रा. ज्योतिका ओझरकर, पाठक सर, अनिल हजारे, सुरेंद्र लागू, शेंड्ये सर आणि इतर अनेक कार्यकर्ते करत असतात. पण त्या दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन म्हणजे आमच्या स्पर्धेची सांगता इतक्या लवकर होते की मनाला चुटपूट लागून राहते. दीड दिवसाच्या त्या तरुणाईने भारलेल्या आणि सळसळलेल्या वातावरणापासून दूर जावे लागणार ही खंत मनाला लागून राहते. पण पुढच्या वर्षी पुन्हा ही स्पर्धा अशाच जोमाने भरणार आहे ही जाणिव होताच मन भरून येते. यंदा स्पर्धेचे ३२ वे वर्ष म्हणजे १८ वर्षांनी या स्पर्धेचा सुवर्ण महोत्सव साजरा होणार आहे पण केवळ तिथेच न थांबता या स्पर्धेची वाटचाल आणखी यशस्वीपणे पुढे चालत राहावी आणि यातूनच अनेक उत्तम वक्ते, विचारवंत पुढे यावेत हीच मनापासून शुभेच्छा.

***

---

गरिबांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा.

# वजाबाकीतून समृद्धी

**शैला जोगळेकर**

> कैलासलेणे - एक अप्रतिम शिल्पानुभव. डोंगरातील अनावश्यक भाग वजा करून उभे राहिलेले अक आश्चर्य. या कैलास लेण्यावरल. - संपादक

अथांग मानवी संस्कृतीचा वेध घेणं जितकं उत्कंठावर्धक, तितकं जिकिरीचं. अनेक साम्राज्ये निर्माण झाली. उलथली गेली. काळाच्या ओघात नामशेष झाली. शिल्लक राहिले ते केवळ शिलालेख, जीर्ण-शीर्ण कागदपत्रे अन् शेकडो हजारो वर्षे थंडी पावसात वादळ वाऱ्यात उभ्या असलेल्या वास्तू या त्यांचे अवशेष.

आपण बांधायचे फक्त अंदाज. या वास्तूतून मग जाणवते रोमनांची शास्त्रीय जाण, ग्रीकांचे परिपूर्णत्व, फ्रेंच्यांची जीवनासक्ती या भारतीयांचे गूढ तत्वज्ञान!

इ. स. पूर्वी ३५०० वर्षांचे इजिप्शियन पिरॅमिडस् असोत, स्फिंक्स असोत वा इ. स. पूर्वी २१४ वर्षांची चिनी भिंत असो, इ. स. च्या सुरुवातीचे रोमनांचे पार्थेनॉन्स, त्यानंतरचे कलोझियम, ॲम्फिथिएटर्स असोत वा १५ व्या १६ व्या शतकातील सेंट पीटर्स, सेंट पॉल सारखी चर्चेस असोत, या वास्तु काय सांगतात?

अन् भारतात तर पार आग्रा फतेहपूर सिक्रीपासून खजुराहो, भुवनेश्वर ते थेट तंजावर-रामेश्वर पर्यंत विखुरलेल्या अगणित वास्तू काय सांगतात? माणसाच्या अथांग मनाची, कल्पना शक्तीची अन् निर्मितीची प्रचंड झेप!

'जमिनीवर अवकाश बंदिस्त करणारी ती वास्तू' अशी वास्तूची सर्वसाधारण व्याख्या करता येईल. मग त्यातील भिंती, खांब, तुळया, छत, दारे, खिडक्या, कमानी, अन् वापरल्या जाणाऱ्या पदार्थांचे शास्त्रीय गुणधर्म लक्षात घेऊन निर्माण झालं वास्तुशास्त्र वा स्थापत्यशास्त्र. एरवी परिपूर्ण वास्तू निर्माण कशी होणार? थोडक्यात वास्तू म्हणजे बेरजेतून निर्माण होणारी समृद्धी. वजाबाकीतून समृद्धी होणं कसं शक्य आहे?

वास्तुशास्त्राचे बांधकाम पद्धतीचे सर्व नियम धाब्यावर बसवून इ. स. पूर्वीच्या ३ ऱ्या शतकापासून ते इ. स. नंतर दहाव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात अनेक ठिकाणी निर्माण झाली 'कोरीव लेणी'. आज आपण वास्तू निर्मिती करतो म्हणजे जमिनीवरील अवकाश बंदिस्त करतो. पण त्या महामानवांनी पहाडातून अशी निर्मिती केली की हजारो वर्षांनंतरही पाहणाऱ्यांनी स्तिमित व्हावं.

इ. स. पूर्व २५५ च्या सुमारास सम्राट अशोक याने बौद्धधर्म राजधर्म म्हणून स्वीकारला व त्याच्या प्रसारासाठी शेवटपर्यंत झटला. अन् मग पुढील सात आठशे वर्षांत निर्माण झाले बौद्ध चैत्य अन् विहार. दुर्गम अशा पर्वतराजीत. शोधण्यास कठीण अशा घळीत. भिक्षुकांना रहाण्यासाठी, प्रार्थनेसाठी, धर्मप्रसारासाठी. पाटणा येथील नालंदा विहाराची क्षमता तर दहा हजार भिक्षुक रहाण्याची होती. एक प्रचंड पीठच होते ते. नाशिक, कार्ले, भाजे, कान्हेरी, कोंडाणे, पितळखोरे, बेडसे, बदामी, अहिहोळ, ओरिसा, जुनागड, गिरनार, अजिंठा, वेरूळ अशा अनेक ठिकाणी ही लेणी निर्माण झाली. वास्तुशास्त्राचे नियम मोडीत काढणाऱ्या या 'वास्तूंना' पाश्चिमात्य टीकाकार वास्तू मानायला तयार नाहीत. त्यांच्यामते ही केवळ शिल्पकला अन् या वास्तूंना ते गुंफा किंवा गुहा म्हणून मोकळे होतात. अजिंठा वेरूळ येथील परदेशी पर्यटकांचे थक्क होणारे चेहरे अन् आश्चर्योद्गार खरं काय ते सांगून जातात. कारण अजिंठा-वेरूळला जगात तोड नाही.

---

सुखी व्हायचा उत्तम उपाय म्हणजे आत्मनिग्रह !

इ. स. पू. २५० ते इ. स. पू. ६४२ पर्यंत म्हणजे सम्राट अशोक पासून थेट चालुक्य वंशाच्या दुसऱ्या पुलकेसीपर्यंत अजिंठा येथील निर्मिती झाली. येथील २७ व २८ क्रमांकाच्या विहारांच काम अर्धवट स्थितीत आढळतं. अंदाज एवढाच बांधायचा की त्या सुमारास तत्कालिन राजकीय परिस्थिती ढवळून निघाली असावी वा परकीय आक्रमण वा युद्ध झालं असावं. अन् येथील कामगारांनी खोदकामाची, कलाकुसरीची हत्यारं टाकून हातात शस्त्र धरली असावीत. कारण नंतर ही घळ ओस पडली. एका प्रचंड धार्मिक पीठाची हालचाल थंडावली. सातव्या शतकाच्या मध्याची ही गोष्ट.

नंतर बराच काळ येथे कोणी फिरकले सुद्धा नाही. या पर्वतराजीतील घळीत पवित्र, कलात्मक अशा वातावरणानंतर शिल्लक राहिली केवळ भयाण स्मशान शांतता. ऊन सावल्यांचा खेळ अन् घळीतनं वाहणारे पाणी. शतकानुशतके चाललेलं एक धर्मपीठ नंतर अनेक शतकं काळाच्या पडद्या आडच राहिलं. त्याच सुमारासं थोडं आधी म्हणजे इ. स. ४५० च्या सुमारास वेरूळ येथे असंच एक पीठ निर्माण होऊ घातलं होतं. येथील विशेष म्हणजे बौद्ध धर्माबरोबर वैदिक व जैन धर्मांची उपस्थिती. येथील १ ते १२ क्रमांकाची बौद्ध लेणी. यातील तीन-तीन मजली त्रिस्थळी विहार म्हणजे माणसाच्या विचारशक्तीचा उत्तुंग आविष्कार!

११ क्रमांकाच्या लेण्याला तीन मजली विहाराला 'द्विस्थळ' म्हटलं गेलं आहे. कारण येथील तळमजला बराच काळ जमिनीखाली गाडला गेला होता. या समूहातील 'विश्वकर्मा' लेणे म्हणजे कलेच्या ईश्वराचे नाव सार्थ करणारे खरेखुरे लेणे.

नंतर १३ ते २९ ही वैदिक लेणी. महत्त्वाची म्हणजे रावणकी खाई, विष्णू दशावतार, शिवालय, कैलास, रामेश्वर अन् सीता स्नानगृह.

पुढे ३० ते ३४ आहे जैनसमूह. त्यात छोटा कैलास, इंद्रसभा अन् जगन्नाथ सभा ही महत्त्वाची लेणी. इ. स. च्या १० व्या शतकात या पर्वांचा देखील अंत झाला. या समूहातील अतुलनीय निर्मिती म्हणजे शिवालय कैलास जवळ जवळ हजार बाराशे वर्षे चाललेल्या या वास्तूकलेच्या शेवटाची सुरूवात म्हणजे कैलास. जणू काही यापेक्षा अधिक मिळविण्यासारखं, निर्माण करण्यासारखं काही राहिलंच नाही.

थोडक्यात काय कैलास हा वास्तूकलेतील उत्तुंग कल्पनाशक्तीचा 'क्लायमॅक्स' होता. कोरीव लेण्यांचे देखील पूर्वीचे संकेत झुगारून देऊन एका प्रचंड पहाडातून साकार झालेल्या या वास्तूला तुलना नाही. 'निर्मितीचं' असं स्वप्न याआधी कुणालाच पडलं नव्हतं. वास्तुशास्त्र हे केवळ भौतिकशास्त्रच न राहता आध्यात्मिक अधिष्ठान लाभल्यावरच अशी वास्तू आकार घेणार. अजिंठा वेरूळला भेट देणारे परदेशी पर्यटक कैलास मंदिर पाहतांना वेडे न झाले तरच नवल. कैलासची निर्मिती वेगळ्या तऱ्हेने झाली.

आतापर्यंत जे काही चैत्य विहार निर्माण झाले त्यांची पद्धत काहीशी अशी होती. पहाडाच्या उभ्या भिंतीवर साधारण प्रमाणित आकृत्या काढून खोदकामाला सुरुवात होत असावी अन् मग मात्र आत शिरून खोदलेला माल बाहेर काढत. प्रथम वरच्या गजपृष्ठाकृती छताचे काम करून शिल्पे कोरून मग खाली येत असावेत. हेतू हा की पायाखाली कायम आधार मिळावा. खोदकाम करणारे जुजबी कारागीर अन् कोरीव काम करणारे कसबी कारागीर असे कदाचित दोन भाग असावेत.

असंच वर्षानुवर्षे पिढ्यान् पिढ्या काम करून जुन्या कामाचा मागोवा घेत आठव्या शतकाच्या मध्यावर भारतातील या कारागिरांना एक प्रकारचा Plastic Sence निर्माण झाला असावा. अन् मग कुणाला तरी 'कैलासाच' स्वप्न पडलं असावं. राष्ट्रकुट वंशातील कृष्णराजाच्या

---

विचारशून्यता ही आजच्या पिढीची सार्वजनिक आपत्ती आहे.

कारकीर्दीत म्हणजे इ. स. ७५७ ते ७८३ मध्ये कैलासाची निर्मिती झाली. अशा प्रकारच्या वास्तूकलेतील कैलास हा अंतिम शब्द हेच पुढील द्रविडी संस्कृतीतील वास्तूंचे मूळ. 'आधी कळस मग पाया' ही स्वप्नवत वाटणारी गोष्ट सत्यात उतरवणारी ही वास्तू. पहाडाच्या माथ्यावरनं उलट खाली येत खोदकाम करीत एकसंध दगडातून निर्माण झालेली जणू काही जमिनीवरून अवकाशात उभी राहिल्याचा आभास निर्माण करणारी वास्तू. तत्कालिन निर्मित ग्रीस येथील पार्थेनॉनच्या बांधकामाएवढा पसारा व त्याच्या दीडपट उंची असणारं हे खोदकाम प्रथम वरून तीन बाजूंनी खाली येत ३०० फूट x१७५ फूट लांबी रुंदीचा चर खणला असावा अन् मधोमध तयार झालं २०० फूट x १०० फूट x १०० फूट उंचीचं बेट. अन् या बेटाच्या वरून खालपर्यंत आतून बाहेरून खोदकाम करीत, शिल्पकाम करीत निर्माण झालं कैलास मंदिर.

एका अखंड शिळेतून पश्चिमाभिमुख मंदिर तयार झाले. पश्चिमेकडे दुमजली प्रवेशद्वार. लगतच २५ फूटx२५ फूट x ५० फूट उंच नंदीचे मंदिर अन् त्याच्या दोन्ही बाजूस उभे असलेले ५१ फूट उंचीचे ध्वजस्तंभ. अतिशय प्रमाणबद्ध, त्रिशुलादि विविध प्रतिकांनी सुशोभित झालेले. नंदीमंदिराच्या पलीकडे असलेले एकसंध ९५ फूट उंचीचे शिवमंदिर, २५ फूट उंचीचे जोते, त्यावर तीनही बाजूंनी हत्तींची शिल्पे, सिंहांची शिल्पे, जणू काही मंदिराचा भारच वाहत आहेत. वरील बाजूस मुख्य मंडप, बाजूला विविध दालने अन् त्यावर तीन मजली कळस. मंदिराच्या चार बाजूंना ४० ते ५० फूट रुंदीचा प्रदक्षिणा पथ अन् त्याही पलीकडे पहाडात खोदलेल्या साधकांना राहण्यासाठी असलेल्या खोल्या, दुमजली दालने अशी ही अतिशय परिपूर्ण निर्मिती.

हा एवढा प्रचंड पसारा पहाडातून निर्माण करणाऱ्या कारागिरांच्या कल्पनाशक्तीचं कौतुक करावं तेवढं थोडच. खरं इतकंच की जेव्हा माणसाची आंतरिक तळमळ अफाट कल्पनाशक्ती बुद्धीचातुर्य अन् हजारो हात एकाच अंतिम ध्येयासाठी झटतात तेव्हाच होते अशी अजोड निर्मिती. अन् 'वजाबाकीतून सुद्धा शक्य होते अपूर्व समृद्धी'.

**शैला जोगळेकर**
३/१९, हेदवेकर वाडी नं. १,
गोखले रोड,
साऊथ, दादर, मुंबई -४०० ०२८

०००

*Shahebaz A. R. Dalvi*
*Partener*

Off. : 342 01 25
: 345 36 34
Godown : 373 54 31
Resi : 346 18 06

*With best compliments from*

# Husain Kasam Mukadam & Suns

**Licenced Custom House Clearing Forwarding, Shipping, Warehousing, Agent's, Govt. Contractors, Freight Brokers, Transporters & Fleet Owners**

89, P. D. Mello Road, 1/12, Shree Krishna Bhavan, Mumbai - 400 009.

दुःखी माणसाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा उपयुक्त आहे.

# 'दरवळणारा सुगंध -टी. चंद्रशेखर'

श्री. अजित पेंढरकर

*आपल्या अंगच्या कर्तृत्वाने ठाणे शहराचा कायापालट करणारे एक व्यक्तिमत्त्व 'टी. चंद्रशेखर' यांच्या विषयीच्या आठवणी. - संपादक*

''दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती' असं फक्त शाळेत असताना शिकलो होतो. पण मनापासून कर जुळतील असं दिव्यत्व प्रत्यक्षात पाहण्याचा योग आजपर्यंत कधी आला नव्हता. सर्व काही इतिहासात ! वर्तमानात मात्र बोंबाबोंब. ज्यांनी शेत राखाव त्या कुंपणाने शेत फस्त करण्याचा व ''त्यात काय झाले, सर्वच जण करतात' म्हणत पंढासारखे मूग गिळून बसण्याचा हा काळ. अशा या नकारात्मक, निरुत्साही, नामर्दतेच्या काळात ही निपजतात शेषन, भाटिया, खैरनार व त्यांचा कळस म्हणजे ठाण्याचे टी. चंद्रशेखर. जर इच्छा शक्ति असेल तर आणि प्रामाणिक पणा असेल तर वाळूच्या कणांतून खरंच तेल काढू शकतो. हे सिद्ध करणारे कर्मयोगी म्हणजे टी. चंद्रशेखर.

केवळ आपल्या कार्यकुशलते वर तमाम ठाणेकर जनतेचे, नव्हे नव्हे, ठाण्यातील सर्व घटकांचे प्रेम मिळवणारे चंद्रशेखर यांची जेव्हा बदली झाली तेव्हा तमाम ठाणे शहर जणू कुटुंबात एखाद्याचे दुख:द निधन व्हावे त्याप्रमाणे सुतकात होते. त्या दिवशी सारे ठाणे शहर शोक मग्न होते, दुःख मग्न होते. परंतू अशाही वेळी 'बचेंगे तो और भी लढेंगे'' ह्या भावनेतून आम्ही काही ठाणेकर, चंद्रशेखरांची बदली रद्द करण्याकरिता रस्त्यावर उतरलो. मोर्चे, बोंबाबोंब, निषेध ह्या ठराविक चाकोरीतल्या लोकशाही अस्त्रांचा वापर करून शेवटी आम्ही प्रत्यक्ष चंद्रशेखर ह्यांचाच सल्ला घेण्याचे ठरवले. त्या प्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या घरी जाण्याचा बेत पक्का केला.

सकाळी ९ च्या सुमारास पाटीलपाडा येथील त्यांच्या निवासस्थानी आम्ही कुठल्याही तऱ्हेची पूर्व कल्पना न देता गेलो. बंगल्याच्या आवारात शिरल्यावर सर्वात प्रथम जाणवली ती म्हणजे तेथील स्वच्छता, सुव्यवस्था व आदर्शीपणा. सर्व सुधारणांची सुरुवात स्वत: पासून होते ह्याचा हा आदर्श नमूना.

पाचच मिनिटात साहेबांकडून बोलावणे आले. आम्ही सर्वजण आत मधे गेलो. साहेबांनी स्वत: आमचे स्वागत केले. तेथे फक्त एक जोडपे बसलेले होते. साहेबांनी त्यांच्या बरोबरही आमची ओळख करून दिली. शिष्टाचाराच्या नियमाप्रमाणे जेव्हा एखादी नवीन व्यक्ति तुमच्या समोर बसलेली असते तेव्हा अशी ओळख करून देणे हा उत्तम शिष्टाचार व पारदर्शकपणा समजला जातो.

चंद्रशेखर यांनी आम्हाला दिलेला सल्ला फारच मोलाचा होता. ते म्हणाले की माझी बदली रद्द करण्याची भुमिका सोडा. बदली हा एक अपरिहार्य भाग आहे. एका व्यक्तिवर सर्व समाजातील विकास अवलंबून न ठेवता सर्व समाजाने जागृत होणे आवश्यक आहे. तुम्ही जागरूक नागरिक संघटना उभ्या करा व त्यांच्यातर्फे महानगरपालिकेच्या कारभारावर वचक ठेवा. जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत, व त्यांचा मापदंडही बदलला आहे. पण त्या प्रमाणे लोकप्रतिनिधी कडून काम करून घेणे हे अशा संघटनांचे समाजाला असलेले देणे परतफेड करणेच होय. त्यांनी सांगितले की तुम्ही प्रामाणिकपणे, निर्भयतेने काम करा ! तुम्हाला कोणी अडवू शकणार नाही. त्यांनी

आम्हाला महानगरपालिकेच्या पुढील पाच वर्षांतील आव्हानांची पुस्तिका दिली व सांगितले की ह्या पुस्तिकेप्रमाणे काम झाल्यास बाकी काही करावयास नको. जर जागृत राहिला नाही तर संपला ! असा ठणकावून इशारा त्यांनी दिला.

व्यक्तिपूजेच्या या जमान्यात व्यक्तिपेक्षा चळवळ श्रेष्ठ असे ठणकावून पणे सांगणारा एक द्रष्टाच जणू बोलत होता. त्यांच्या शेजारी बसून त्यांना प्रत्यक्ष बघताना, त्यांचे बोलणे ऐकताना अत्यंत आनंद होत होता. ती खोली जणू सकारात्मक वातावरणाने भरून गेली होती. अजूनही आशा आहे. हम भी कुछ करेंगे अशा भावनेने सर्वजण भारावून गेले होते.

कौटुंबिक प्रेमळपणे घरचा चहा आला व चहा घेऊन आम्ही सर्वजण त्यांचा निरोप घेऊ लागलो. तेवढ्यात माझ्या पत्नीने त्यांच्या सौ. करीता खास आठवणीने आणलेला गजरा बाहेर काढला. चंद्रशेखर साहेबांनी आपल्या पत्नीला आवर्जून बाहेर बोलावले. त्यांनी तो गजरा प्रेमळपणाने स्विकारला. गजऱ्याची पुडी उघडली व खोलीत वास दरवळला. पण जाताना माझ्या मनांत संभ्रम होता की हा सुवास गजऱ्याचा का साहेबांच्या कार्यांचा ! मी मलाच उत्तर दिले की गजऱ्याचा सुहास काही क्षण पण त्यांच्या कार्यांचा सुवास त्रिकालाबाधित आहे. एका भारावलेल्या स्थितीत आम्ही तिथून बाहेर पडलो.

**अजित पेंढरकर**
इ ७, आनंद पार्क,
ठाणे ४०० ६०१.
दूरध्वनी: ५३३ ३१०२

***

*With Best Compliments From*

SURBHI AGROTECH LTD.

Shivanand Building, Near TMT Bus Stand,
Gaon Devi Maidan Cross Road, Thane (West)
**Phone 533 4599**

**Having its Regional Office at Calcutta, Bangalore, Cochin & Thane**

*DOUBLE YOUR INVESMENT JUST IN FOUR YEARS*

**विद्येचे फळ म्हणजे उत्तम चारित्र्य आणि सदाचार.**

# पंचेचाळीस हजाराचा जीव

**प्रा. प्रदीप कर्णिक**

*प्रा. सुहास बापट! जोशी बेडेकर महाविद्यालयातले मराठी विभागातले विद्यार्थीप्रिय शिक्षक. त्या वेळच्या काही कारणांनी रूपारेल मध्ये गेले... तेथेही विद्यार्थीप्रिय आणि सहकाऱ्यांस प्रिय ठरले. अचानक नियतीने डाव साधला... आणि मग बापटसरांसाठी रात्रंदिवस प्रयत्न करणारा इतिहास घडला. आजही अशी कोणावर वेळ आली दुर्दैवाने तर... प्रा. कर्णिक यांचा हा लेख त्या दृष्टीने! - संपादक*

प्रा. सुहास भालचंद्र बापट एक उत्तम शिक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. हुषार, बुद्धीमान, चांगले वाचन असणारा हा गृहस्थ विद्यार्थीवर्गात तेवढाच प्रिय! त्यांची राजकीय, सामाजिक विश्लेषणे मनाला भारावून टाकतात. शासकीय, संस्थात्मक, व्यक्तीगत पातळ्यांवरील गोंधळाचे इरसाल नमुने अनेक संस्था पाहून आलेल्या त्यांच्याकडून ऐकावला मिळतात. लेखक, समीक्षक आणि उत्तम संगीतज्ज्ञ म्हणून जेव्हा मी त्यांना पाहातो तेव्हा मनात ते कायम होत जातात. अशा कायम घर करून राहिलेल्या बापटांच्या बाबतीत माझ्यासारख्या स्नेहाच्या कानावर जेव्हा शद्ब येतात 'बापटांना कॅन्सर झालाय, माहीत आहे तुम्हाला?' तेव्हा मन फाटून जाते. बधिर होते. गप्प गप्प होते. असे कसे घडले? काय उत्तर देणार नि काय करणार! सारेच सुन्न करणारे.

मग Encyclopedia मधल्या नोंदी पाहिल्या जातात. कॅन्सरवरची पुस्तके चाळली जातात. 'लाख मोलाचा जीव' मनात पुन्हा वाचला जातो. कॉलेजचा पहिला दिवस संपल्यानंतर दुसरा, तिसरा बापटांशिवाय उजाडतो. ते टाटाच्या सातव्या मजल्यावर. बंद कडेकोट आणि आम्ही चहा पीत त्यांच्याशिवाय, त्यांच्या गप्पांशिवाय, त्यांच्या विनोदाशिवाय तितकेच स्वतःला बंद बंद करत जाणारे.

नुसते गप्पगार बसून काय होणार होते. काही तरी करायलाच हवे होते. पैसा किती लागणार? केव्हा लागणार? कोण देणार? कसा देणार? हजार प्रश्न. हा आजार बरा होतो का? किती वेळ लागतो? पूर्ण बरा होतो का? ते पुन्हा शिकवायला येऊ शकतील का? असंख्य प्रश्न. प्रत्येक प्रश्नाला हजार उत्तरे आणि सारीच उत्तरे गोंधळ वाढवणारी, नव्याने गोंधळात टाकणारी.

कोणी म्हणाले, 'त्यांना सरकारकडून पैसे मिळतील.' कुणी अलगद बाजूला नेले आणि हळूच म्हणाले, 'आपण पैसे जमा करू या' कुणीतरी झेरॉक्स केलेली काही पाने दिली आणि म्हणाले, 'यात बाचा रजाविजाविषयी सर्व आहे.' 'मी सांगतो, त्यांना ॲडव्हान्स रक्कम सरकारकडून मिळायला हवी' निक्षून सांगणारा एखादा विनवीत म्हणाला.

मेडीकलविषयीचे काय काय कायदे आहेत समजत नव्हते, उमजत नव्हते. शासकीय पत्रके उपलब्ध होत नव्हती. प्रश्न पडले, हे एकत्र कुठे मिळेल? पैसे परत मिळतात का? ॲडव्हान्स खरच मिळू शकतो का? किती मिळतो? कोणाला मिळतो? काय काय करावे लागते त्यासाठी? हे सारे G.R. कुठे मिळतील? पुन्हा एक शून्य धडपड. शून्य प्रतिसाद. शून्य निष्पत्र.

'ॲडव्हान्स' मिळतो अशी खात्रीलायक माहिती मिळाली पण तीही तोंडीच. लेखी काय? शून्य. म्हणून चर्चा केली. प्रश्न विचारले. माहितीसाठी हात पसरले. माहिती मिळेचना. 'ॲडव्हान्स मिळतच नाही, मी सांगतो बिले सादर केल्यानंतर झालेला खर्च एकवेळ मिळेल पण

ॲडव्हान्स नक्की च मिळणार नाही' एक अनुभवी प्रतिसाद. पुन्हा गडबड. पुन्हा निराशा. काय करावे? पैसे तर लगेचच हवे आहेत. शून्यच शून्य सारीकडे.

शेवटी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या युनियनच्या फाईलमधून एक शासकीय परिपत्रक मिळते. त्याच परिपत्रकात ॲडव्हान्सचा स्पष्ट उल्लेख मिळतो. पहिला लिखित पुरावा मिळतो. कोलंबसी हास्य फुटते. पुन्हा चर्चा, पुन्हा उलटसुलट मतभेद. 'आपण ॲडव्हान्सपेक्षा बिलेच सादर करू या. कशाला हवा ॲडव्हान्स.' एक चीड आणणारी नेभळट प्रतिक्रिया. परंतु पुन्हा ॲडव्हान्सचाच आग्रह. त्याचाच होता आणि हा ॲडव्हान्स साधासुधा नाही रूपये दहा हजारावरून ४५,०००/- नेलेला. म्हणजे जर प्रयत्न केला तर ४५,०००/- रूपये मिळतील. बापटांना सहाय्य होईल. ते बरे होतील. खरच करायला हवा प्रयत्न. निदान टेस्ट केस म्हणून तरी. त्यांना तर मदत होईलच होईल पण नंतर जर असा आघात कोणावर झाला तर त्यालाही फायदा होईल.

परिपत्रकाच्या झेरॉक्स काढल्या जातात. ते परिपत्रक वार वार वेळा वाचले जाते. उलटसुलट अर्थ लावला जातो. डिग्री कॉलेजचा स्पष्ट उल्लेख मिळतो. मग कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे काय? त्यांना मिळणार की नाही? पुन्हा निराशा, पुन्हा एकदा धडपड.

आता मंत्रालय गाठावे हेच बरे. तेथेच मिळेल काही तरी. तो मूळ ४५,०००/- रकमेचा G.R. काय आहे ते तरी पहावे. त्यात काही तरी मिळेल. माहिती काढणे चालूच होते. वेगवेगळ्या संस्थांमधून, व्यक्तींकडून माहिती मिळवण्याची धडपड चालूच होती. एका संस्थेत माहिती देणाऱ्या गृहस्थाने निक्षून सांगितले, 'ते ज्युनिअरचे आहेत ना मग अजिबात प्रयत्न करू नका, पैसे मिळणार नाहीत.' फारच राग आला पण करणार काय? हात अडकले होते.

एका विद्वान, अत्यंत अनुभवी सद्‌गृहस्थाने मात्र फार धीर दिला. 'अरे हे आहे काय? सरकार प्राध्यापकांना मदत देते आणि तिच सवलत कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राध्यापकांना देत नाही म्हणजे काय? मी आकाश पाताळ एक करीन पण ही सवलत जर नसेल तर ती मिळवून देईन.' मनाला धीर मिळतो आधार वाटतो. हा माणूस आपल्याबरोबर भांडेल याची खात्री वाटते.

मंत्रालयाच्या खेट्या चालू होतात. सारे जण नीट ऐकून घेतात. त्यांना सहानुभूती वाटते. खर्चाचा आकडा ऐकून त्यांना आमची कीव येते. आत्मीयतेने सारी माहिती विचारतात. 'काय होईल ते नक्की करीन' असे आश्वासन मिळते. चांगुलपणाचा अनुभव येतो.

मग प्रथम ४५,०००/- चा उल्लेख असणारा G.R. हाती पडतो.आधाशासारखे शब्द न् शब्द वाचून काढले जातात. पण जास्त काहीच पदरी पडत नाही. ही रकम संमत करण्याचे अधिकार कोणाला आहे इतकेच समजते.

काही जण 'आठ दिवसांनी या, माहिती काढून ठेवतो' असे सांगतात. तेथे इलाज नसतो. कारण एकत्र माहिती पटकन मिळतच नाही. अशा रोगांना काय काय सवलती आहेत हे पटकन न मिळाल्याने आम्ही परत येतो. आठव्या दिवशी 'दत्त' म्हणून हजर होतो. माहिती मिळते, 'काहीच होणार नाही. अशा सवलती कनिष्ठ महाविद्यालयांसाठी नाहीत. कृपाकरून मेहनत फुकट वाया घालवू नका.'

पुन्हा निराशा, पुन्हा अंगाचे पाणी पाणी होते. आता काय? एक मोठे प्रश्नचिन्ह. तोच एक स्नेही भेटतात. अडचण सांगितली जाते. बसायला सांगून ते कुठेतरी जातात. पाच मिनिटात एक G.R. आणतात. तो १९८० चा असतो. त्यात असे स्पष्टच असते की शासकीय कर्मचाऱ्यांना/टि.वी. आणि कॅन्सरसाठी/असणाऱ्या सवलती कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळेतील शिक्षक इत्यादींसाठीही देण्यात आल्या

गरिबांना दु:ख अनुभवाने कळते, पण श्रीमंतांना बुद्धीने ते जाणून घ्यावे लागते.

आहेत. वाचून आनंद होतो. धीर येतो. बळ येते. चला, यावर आपल्याला काही करता येईल असा विश्वास वाटतो. पुन्हा झेरॉक्स प्रती निघाल्या जातात.

आता प्रश्न निर्माण होतो ४५,०००/- साठी अर्ज कसा करायचा? त्याचा काही छापील फॉर्म असतो का? पुन्हा धावाधाव. पुन्हा शंका. मग ह्याचे मत ऐकून घे, त्याचे मत ऐकून घे, असा प्रकार सुरू होतो. हे चालू असतांनाच कोणीतरी सांगते 'ज्यांनी G.R. हा काढला आहे त्या अधिकाऱ्यांनाच जाऊन विचारा की छापील नमुना आहे का? की अर्ज नुसताच करायचा? हा विचार छान वाटतो. आम्ही मग त्या अधिकाऱ्याच्या शोधात. एकदाची त्यांची गुहा सापडते. ते फोनवर बोलत असतात. आम्हाला बसण्याची खूण करतात. आम्ही बसतो फोन संपायची वाट बघत. त्यांचा फोन संपतो आणि मग ते आमच्याकडे वळतात. 'बोला' एक आपुलकीचा स्वर उमटतो. एका शद्वात सामर्थ्य लाभतं. आम्ही सारी कहाणी सांगतो. ते हळहळतात. आपुलकीनं माहिती देतात. त्यांनीच तो G.R. काढलेला असल्याने खात्रीलायक माहिती मिळते. अर्जाचा छापील असा नमुना नाही. सारी कागदपत्रे जोडायची आणि पुण्याला संचालकांकडे पाठवायची. चला एक टप्पा पुरा झाल्याचे समाधान मिळते. सारे G.R., सारी माहिती मंत्रालयातूनच उपलब्ध होते. त्याचे अर्थ लावले जातात. आणि हाती सारी कागदपत्रे यायला किमान वीस ते पंचवीस दिवस घालवावे लागतात. 'हे सारे G.R. तुम्हाला तुमच्या व्यवस्थापनाकडूनच उपलब्ध व्हायला पाहिजे होते. ते का नाही झाले याचे आश्चर्यच वाटते' एका स्नेह्यांची प्रांजळ तरी शासकीय जबरीची तीव्र प्रतिक्रिया आम्ही मुकाट ऐकतो. अडला नारायणच्या तालावर.

आता प्रवास सुरू होतो अर्ज तयार करण्याचा. त्यावर प्रमुखांच्या शिफारसी घेण्याचा. हा प्रवासही तितकाच कठीण. यथायोग्य अर्ज पाहिजे. अर्ज करणारे स्वत: बापट हवेत. बापट हवेत म्हणजे पुन्हा त्यांची सही घेणे आले. पुन्हा धावपळ. बापटांची सही मिळते. आमचे विद्वान, अनुभवी स्नेही स्वत: अर्ज तयार करून देतात. आता फक्त शिफारसीचे काम उरते. एक दिवस असाच जातो. प्रमुखांना टी.व्ही. वर काही कार्यक्रम असतो. दुसऱ्या दिवशीचे आश्वासन मिळते. दुसऱ्या दिवशीही ते तीन वाजेपर्यंत शक्य होत नाहीत. मग आमचे दुसरे दोन तीन स्नेही पुढे येतात. त्यांच्यामुळे शिफारसीचे पत्र तयार होते. सही होते. प्रमुखांकडून एक चिठ्ठी मिळते ओळखीची. अशाच दोनतीन ओळखी आम्हीही घेतलेल्या असतात.

आम्ही पुण्याला निघतो. मनात आशा असते. काम होणार आहे याचा विश्वास वाटत असतो. बसमधून उतरतो ते तडक कचेरी गाठतो. एकेक ओळखीचा पदर पकडून माहिती काढतो. साऱ्यांना हे नवीनच असते. तरीही मदतीसाठी सारेच तयार होतात. पण एक खोच निघते. हा सारा अर्ज मुंबईतल्या कचेरीतून शिफारस करून आणायचा असतो. तोच आमच्याकडून राहिलेला असतो. आमच्या प्रमुखांनाही तसे वाटत असते. पण ज्या कचेरीने तो शिफारस करून पाठवायचा असतो त्याच कचेरीतील एक स्नेही छातीवर हात ठेवून आम्हाला सांगत होता की 'तुम्ही पुण्याला जा तिथेच तुमचे आता काम होणार आहे. आमचा इलाज नसतो. आम्हाला जावेच लागते. हे छातीठोक उत्तर आम्ही भीतभीत पुण्याला ऐकवतो. ते ऐकत नाहीत. ते म्हणतात, 'तुम्ही त्या मुंबईच्या कचेरीची शिफारस आणा. त्याच क्षणाला हा अर्ज पुढे पाठवतो.' आता काय करावे उमगत नाही. मुंबईला परत येण्याशिवाय पर्याय नसतो. पण एक स्नेही म्हणतात, ' तुम्ही आलाच आहात तर संचालक साहेबांना भेटून जा' आम्हालाही तो विचार पटतो.

आम्ही ताटकळत दोन तास संचालकांच्या खोलीबाहेर न जेवता न खाता. आतमधल्या माणसांचे बोलणे संपतच नाही. आम्ही आशाळभूतपणे शिपायाच्या तोंडाकडे पहातो. तो खुणेनेच, 'बसा. बसा. साहेब कामात आहेत' असा सूचक इशारा करतो. आम्ही वाट पहात

बसतो. दरवाजे हलतात. शेवटी आमची प्रतीक्षा संपते. आतला माणूस तसाच आत असतो. चिकटलेला. असो. आम्हाला प्रवेश तर मिळाला.

आम्ही आमची कहाणी पुन्हा सांगतो. ते ऐकून घेतात. 'हे काम होणार नाही' पटकन मत देऊन टाकतात. आम्ही पुन्हा विनंती करतो. 'त्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती आहे. झालेला खर्च परत मिळणार आहे. डीग्री कॉलेजच्या प्राध्यापकांना शासनाच्या मेडिकलसंबंधीच्या सवलती ॲडव्हान्ससह लागू आहेत. १९८० च्या G.R. नुसार कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांना त्या सवलती वाढवून दिल्या आहेत. त्या अर्थी बापटांना पैसे मिळायला हरकत नाही' त्यांना मुद्दे पटतात. विचार करण्यासारखे वाटतात. ते म्हणतात, 'मला एक तास यावर विचार करू दे. तुम्ही एक तासाने या.'

एका तासाच्या आतच आम्ही हजर होतो. ते आम्हाला बोलावतात. म्हणतात, 'तुमचे म्हणणे योग्य आहे. पण जोपर्यंत तसा स्पष्ट उल्लेख G.R. मध्ये नाही तोपर्यंत काहीही करता येणार नाही. मी ही केस मुंबईत मंत्रालयात सल्ल्यासाठी पाठवत आहे. ती सोमवारी वा बुधवारी तेथे पोहोचेल. तुम्ही बाकी प्रयत्न तिथे करा. मी योग्य आणि शक्य तेवढी संमत होईल अशी शिफारस जोडली आहे. आम्हाला बरे वाटते. सारे शरीर हात बनून आभार मानते. आम्ही बाहेर येतो. सुटकेचा श्वास म्हणजे काय ते जवळून समजते. त्यांची ओळख निघते. गप्पाही होतात.

मग आम्ही आमच्या दुसऱ्या स्नेह्यांना भेटतो. त्यांना सांगतो. बापट त्यांना 'आलोचने'मुळे माहीत असतात. मुंबईच्या कचेरीची शिफारस ते घेतात. फोन करतात. आश्वासन मिळवतात. आम्ही परत मुंबईला येतो तेंव्हा रात्रीचे १२ ते १२.३० झालेले असतात. आता उद्या पासून मंत्रालय मोहीम सुरू करायची असे ठरवून घरी येतो.

मुंबईला ज्यांच्याकडे ही केस येणार असते त्यांना ओळखणारे स्नेही आपणहून मदत करतात. फोन, पत्रे, भेटून सांगणे सारे होते. आम्ही त्यांना भेटतो. सारी कहाणी कथन करतो. पुण्याला दिलेली कागदपत्रे अजून मुंबईला आलेली नसतात. ते दोन तीन दिवस थांबायला सांगतात. आम्ही त्याच कागदपत्रांची दुसरी पत्र त्यांना देऊन ठेवतो. पुन्हा दोन दिवसांनी आम्ही हजर होतो. कागदपत्र अजूनही आलेली नसतात. ते आम्हाला सल्ला देतात, 'आजच पुण्याला जा आणि त्यांच्या शिफारसीचा कागद झेरॉक्स करून आणा. मी पुढे पहातो.'

आता पुन्हा पुण्याला पळण्याशिवाय पर्याय नसतो. व्हरांड्यातून जात असतांना पुण्याला कसे जायचे, कोणी जायचे, याचा विचार करत असतांनाच एक कल्पना तरळते. मंत्रालयाच्या टपाल विभागात जाऊन पाहिले तर! आम्ही त्या विचारासरशी जातो देखील. शोधाशोध करतो. शेवटी एकदाचे पुण्याचे शिफारसपत्र मिळते. बाकीचे कागदपत्र मिळत नाहीत. पुन्हा 'युरेका युरेका' चा आनंद होतो.

शिफारसपत्र संबंधित माणसांकडून फिरवत फिरवत योग्य त्या माणसापर्यंत आम्ही आणतो. ते पहातात. 'उद्याच मी माझी शिफारस जोडून ही केस वित्तविभागाकडे पाठवेन. तुम्ही आता सारे प्रयत्न तिथे करा.' आम्ही ही केस कोणाकडे जाणार याची माहिती घेतो. पुन्हा एकदा सारे शरीर आभारासाठी हात होते.

ज्या माणसाकडे ही केस जाणार असते त्यांना एका स्नेह्यांमार्फत आम्ही भेटतो. 'बापट कहाणी' कथन करतो. ते पुन्हा 'जे होईल ते करीन' असे आश्वासन देतात. पुन्हा यायला सांगतात. आम्ही पुन्हा दोन तीन दिवसांनी जातो. त्यांचा स्वर बदललेला असतो. शब्द आठवत नाहीत. आम्ही नकार ओळखतो. 'आम्हाला ही केस संमत करता येणार नाही. यांना जर अशी मदत दिली तर सर्वच शिक्षकांना ही मदत द्यावी लागेल. हे सरकारला परवडणार नाही,' ते सांगतात.

---

आम्ही पुन्हा विनंती करतो. 'अहो सरकार मदत करणारच आहे. त्यांना पैसे एवढ मिळणार आहेत. हा फक्त औपचारिक आहे. ते त्यांच्या नियमानुसार मंजूर करायचा आहे.'

तरीही ते ऐकून घेत नाहीत. आमचा नाईलाज होतो. मग आम्ही परत त्या संस्थांकडे जातो. तेथून सल्ला घेण्यासाठी अजून दोन संस्थांकडे जातो. त्यांना 'वापर प्रहाणी' मागतो. ते फोन करतात, सरकारी भाषेत समजावून सांगतात. पलिकडील व्यक्तीला ते पटते. योग्य वाटते. ती ते सारे बदल करण्यास कबूल होते. आमची केस संमत होते.

ती फाईल फिरत फिरत पुन्हा मूळ व्यक्तीकडे येते. हा वापटांच्या नावाचा खास /G.R. काढण्याचे आदेश सुटतात. आठ एक दिवसात/G.R. ही निघतो. G.R. ची प्रत आमच्याकडे देतात. आम्ही खूष असतो. आभार मानतो.

आता पैसे कोणी द्यायचे, कसे द्यायचे, ही चर्चा सुरू होते. G.R. काढणाऱ्या अधिकारीबाई आम्हाला त्यांच्या ओळखीच्या माणसाकडे पाठवतात. आम्ही जातो. ते सल्ला देतात. 'हे पैसे दोन प्रकारे देता येतील. एक, संस्थेने ते पैसे अगोदर त्या व्यक्तीला द्यायचे मग सरकारकडे क्लेम करायचे. दोन, सरकारकडेच क्लेम करायचे. सरकार चेक त्या व्यक्तीच्या खात्यात जमा करेल.'

चला इथपर्यंत तर आलो. हे दोनही मार्ग कथन केले जातात. दुसराच मार्ग स्वीकारला जातो. तरीही तो क्लेम कसा करायचा याचे ज्ञानच नसते. म्हणून जिथे हे क्लेम करायचे आहेत तेथेच सल्ला विचारायला जावे लागते. तेथेही अत्यंत जिव्हाळ्याने चौकशी होते. मदत मिळते. क्लेम करायच्या कागदपत्रांचे नमुने पहायला मिळतात. तातडीने ते भरले जातात. आणि त्वरित त्या कचेरीत सादरही केले जातात. पंधरा दिवसांत हे काम होईल, असे आश्वासन मिळते. एक दोनदा चौकशी करावी लागते इतकेच. पण चेक तयार होतो. वापटांच्या खात्यात जमा होतो. वापटांना मदत होते.

एका उत्तम शिक्षकाला मदत योग्य वेळी केल्याने आणि शासकीय पातळीवरच फक्त चांगली मदत मिळाल्याने अनेकांना समाधान मिळते. दोष, नकारात्म मनोवृत्ती, मदतीची वृत्ती, आळशीपणा, साऱ्यांचे मूल्यमापन मागे मागे पडते. वापटांना मानसिक समाधान मिळते. त्यांच्या हक्काचे पैसे त्यांना क्लेम करून पंधरा दिवसात मिळतात. हे जेव्हा समजते तेव्हा सारेच शासनाचे आभार मानतात. एक दिलासा उत्पन्न होतो. मनात घुमत राहतो.

**प्रा. प्रदीप कर्णिक**
सोनल, वंदना सोसायटीसमोर,
ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी क्र. - ५४०४२०६
●●●

**दगडावर संगीत रचना**

सुमारे १४०० वर्षांपूर्वी एका भारतीय संगीतकाराने संगीत क्षेत्रात इतिहास निर्माण केला. त्याने त्याची संगीत रचना नोटेशनच्या रूपात चक्क दगडावर कोरून ठेवली. नोटेशनच्या रूपात उपलब्ध असलेले हे सर्वात प्राचीन भारतीय संगीत. या नोटेशनमध्ये सात सुरांव्यतिरिक्त सात जाती व काही श्रुतींचाही वापर केलेला आहे. सातव्या शतकातले भारतीय संगीत किती परिपूर्ण होते याची साक्ष देणारे हे नोटेशन तामिळनाडूतील मदुराईच्या उत्तरेकडील कुडूमिया मलाई या टेकडीवर सापडले. या संगीतकाराचे नाव होते परम माहेश्वरा. तो रुद्राचार्यांचा शिष्य होता.

# लीजंडस् - पुस्तक परिचय

**श्री. चिंतामणी भिडे**

*अभिजित देसाई यांचे 'लीजंडस्' हे पुस्तक अलिकडेच ज्ञानदा प्रकाशनाने प्रकाशित केले. त्याचा हा परिचय - संपादक*

हिंदी चित्रपटांविषयी तुम्हाला आपुलकी आहे का? तो तुमच्या जिव्हाळ्याचा विषय आहे का? कलाकारांविषयी तुम्हाला आत्मीयता वाटते का? मुख्य म्हणजे हिंदी चित्रपटांचे तुम्ही कट्टर फॅन आहात का? कट्टर फॅन म्हणजे समीक्षकाच्या समीक्षा वाचून चित्रपट पहायचा की नाही हे जो ठरवत नाही तो कट्टर फॅन. म्हणजेच येणारा प्रत्येक चित्रपट पाहणे हे आपले आद्य कर्तव्य समजून, चित्रपटगृह म्हणजे ज्याच्या लेखी तीर्थक्षेत्रे आहेत, अशा फिल्मबाजांसाठी एका फिल्मबाजाने अनोखी भेट आणलेली आहे.

लोकप्रभा साप्ताहिकाचे चित्रपट समीक्षक अभिजित देसाई यांचे 'लीजंडस्' हे सिनेसृष्टीतील काही आभाळाएवढ्या कलावंतांना मानवंदना वाहणारे पुस्तक ज्ञानदा पब्लिकेशनने नुकतेच प्रकाशित केले आहे. श्री. देसाई गेली बारा वर्षे लोकप्रभातून सातत्याने चित्रपटविषयक लिखाण करीत आहेत. आक्रमक, टोकदार, नाट्यमय, स्वत:ची आग्रही मतं ठासून मांडण्याची त्यांची शैली लोकप्रभाच्या वाचकांना परिचित आहे. मुख्य म्हणजे त्यांच्या लिखाणातून जाणवतं ते या माध्यमावरील त्यांचे प्रेम. हेच प्रेम 'लीजंडस्'मध्येही जागोजागी दिसतं. या प्रेमाला त्यांनी जोड दिली आहे ती अफाट अभ्यासाची आणि संशोधनाची. 'दिलीपकुमारने १९५५ साली औदासीन्यावर इलाज करण्यासाठी ज्या मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घेतला त्याचे नाव डॉ. डब्ल्यू. डी. निकोल होतं, यासारखी माहिती तर या पुस्तकात पानापानावर विखुरलेली आढळते.

लीजंडस् म्हणून त्यांनी दिलीपकुमार, देव आनंद, अशोक कुमार, राज कपूर, गुरूदत्त, विजय आनंद आणि अमिताभ बच्चन या 'ऑल टाईम लीजंडस्'ची निवड केली. या निवडीवर वाद होऊ शकतो. हे सात कलावंतच का आणि इतर का नाहीत? मुख्य म्हणजे यात नायिका नाहीत. पण 'लीजंडस्' याच नावाने नायिकांचा लेखसंग्रह तयार करण्याचा खलनायकी विचारही डोकावतो' असे म्हणून देसाई प्रांजळपणे मनोगतातच त्याचे उत्तर देतात. मात्र वरील सात कलाकार निवडल्यावर आणि एकदा 'लीजंडस्' नाव ठरवल्यावर ते मनोगतात म्हणतात, 'याची वाट लावून टाकतो' किंवा 'याला खलास करतो' म्हणत आसूड ओढण्याची ही जागा नव्हे हे उमगल्यानंतर अट्टाहासाने 'विनपाण्याने' करण्याची गरज भासली नाही आणि ज्यांनी पिढ्यान पिढ्या आनंद दिलाय, त्यांना मानवंदना करण्यात गैर ते काय? हे पथ्य त्यांनी पुस्तकभर पाळले आहे. प्रचंड अभ्यासाला आपल्या नाट्यमय, आक्रमक लिखाणाची जोड देऊन त्यांनी ते पुस्तक एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले आहे.

वाचकाला आपल्या बरोबर घेऊन जाण्याची त्यांची हातोटी अचंबित करणारी आहे. वाचक त्यांचे लिखाण कमालीचा समरस होऊन वाचतो. 'आजवर सगळे नायक पाहिले पण दिलीपकुमार व अमिताभ बच्चन यांच्या आसपास कोणी नाही हे माझं मत दिवसागणिक अधिकाधिक ठाम होत चाललय' हे वाचतांना वाचकांना आपलच मत कोणीतरी मांडतोय, हे वाचून आनंद होतो आणि लेखक वाचक यांच्या हृदयाच्या तारा चटकन जुळतात. 'ऐ आव रे आव, माँ का दूध पिया है तो एकेक आव' म्हणत हरीवाबूच्या अंगावर चित्त्याप्रमाणे झेपावू

पाहणारा गंगा नाही तर 'अश्रू श्वेत से लथपथ' असा निर्जीव डोळ्यांनी आईच्या मांडीवर विसावणारा विजय दिनानाथ चौहान मला उध्वस्त करून सोडतात, हे वाचतांना वाचकही आतल्या आत कुठेतरी अस्वस्थ होतो आणि त्यांच्या डोळ्यासमोर अनुक्रमे 'गंगा जमना' तील दिलीपकुमार आणि 'अग्निपथ' मधील अमिताभ बच्चन यांची जीवाला चटका लावणारी अदाकारी उभी राहून मन गलबलून जातं. त्याच बरोबर 'सौदागर', 'किला' आणि 'लाल बादशहा' पाहतांना 'गंगा जमना' व 'अग्निपथ'ची पुण्याई कामाला येत नाही, या दाहक वास्तवाची बोचरी जाणीवही ते करून देतात.

'नौ दो ग्यारह' दिग्दर्शनासाठी मिळावा म्हणून विजय आनंदने केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा, 'प्यासा'च्या यशावर स्वार होऊन काढलेला 'कागज के फूल' पडल्याने मानसिकरित्या उध्वस्त झालेला गुरूदेव, गिरगांव कोर्टात मधुबालावरील प्रेमाची उघड कबुली देणारा आणि नंतर अनपेक्षितपणे बी. आर. चोप्रा व 'नया दौर' च्या पाठीशी उभा राहत तिच्या विरूद्ध साक्ष देणारा दिलीपकुमार, ब्रीच कॅंडी इस्पितळात मृत्युशी झुंज देणारा अमिताभ आणि हवालदिल झालेली जनता, गेल्या वीस वर्षात यशाचं तोंडही न पाहिलेल्या तरीही आगामी चित्रपटाविषयी उत्साहाने बोलणारा देव आनंद, वयानुसार योग्यवेळी भूमिकांची आतकुळी बदलणारा अशोक कुमार उर्फ दादामुनी या सर्वांचं चित्र त्यांनी मोठ्या ताकदीने रंगवलं आहे.

पुस्तकांसाठी त्यांच्या पटकथेचा फॉर्म वापरला आहे. पुस्तक वाचतांना त्या त्या कलाकारावर एखादी फिल्मच पाहत असल्याचा भास होत राहतो. रूक्ष आकडेवारीच्या जंजाळात पुस्तकाला न अडकवता, त्याकाळी घडलेल्या घटनांचा मागोवा घेत त्याद्वारे व्यक्तिरेखा उलगडण्याचा प्रयास त्यांनी केला आहे आणि त्यात ते कमालीचे यशस्वी झाले आहेत. त्यासाठी नाट्यमयतेचा भरपूर वापर त्यांनी केला आहे. वाक्याची सुरुवात आणि शेवट पंचलाईनने करण्यावर त्यांचा भर दिसतो. त्यातून ही नाट्यमयता गडद होत जाते. संपूर्ण पुस्तकात हे वैशिष्ट्य सतत जाणवत राहतं. गुरूदत्तच्या मृत्युबद्दल ते लिहितात, ' स्वर्गातल्या वहिखात्यात चित्रगुप्ताने नोंद केली : - महान निर्माता-दिग्दर्शक : गुरूदत्त, जन्म : ९ जुलै १९२५, मृत्यू : १० ऑक्टोबर १९६४.'

गुरूदत्तच्या संदर्भात त्यांनी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे, 'त्याचा मृत्यू जसा झाला तसा तो झाला नसता तर सिनेमावाल्यांनी त्याची गणना श्रेष्ठ दिग्दर्शकांच्या पठडीत केली असती का?'

यासारखे असंख्य प्रश्न त्यांनी या पुस्तकात उपस्थित केले आहेत. त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातूनच अस्तित्वात आलंय एक नितांत सुंदर पुस्तक. पुस्तक लिहितांना एक अवघड कामगिरी त्यांच्यासमोर होती. ती म्हणजे वाचकांच्या मनात या लीजंड्सच्या ज्या प्रतिमा आहेत त्यांना धक्का लागू न देणे. ती त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. 'लीजंडस्'च्या यादीत विजय आनंदचे नाव पाहून अनेक जण भुवया उंचावण्याची शक्यता आहे. 'लीजंडस्' म्हटल्यावर चटकन डोळ्यासमोर न येणाऱ्या या दिग्दर्शकाची ताकद ज्वेल थीफ, तिसरी मंझील, गाईड आणि तेरे मेरे सपने पाहतांना जाणवते. विजय आनंदला योग्य न्याय दिल्याबद्दल श्री. देसाई निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. चित्रपटप्रेमी वाचकांसाठी हे पुस्तक म्हणजे मेजवानीच आहे. पुस्तकाच्या नावाप्रमाणेच हे पुस्तक चित्रपटविषयक साहित्यात लीजंड ठरेल यात काय संशय?

(लीजंडस्, अभिजित देसाई, ग्रामदा पब्लिकेशन प्रा.लि., पुणे)

**श्री. चिंतामणी भिडे,**
सरस्वती, डॉ. मनोहर वाडी,
संत तुकाराम मार्ग, जय गणेश टॉकीज जवळ,
मुलुंड (पू.)-४०००८१.
(दूरध्वनी क्र. - ५६५४३६५)

***

# समर्थ रामदास (उत्तरार्ध)

सौ. मीरा लिमये

*समर्थ रामदास स्वामींच्या व शिवाजी महाराजांच्या आंतरिक संबंधाचे संदर्भ या लेखात वाचावयास मिळतील.   - संपादक*

वाई, सातारा, उंब्रज, माहुली अशा अनेक ठिकाणी समर्थ गेले. तेथे त्यांनी तरुण मुलांना हाताशी धरले. मठ-मंदिरांची स्थापना केली. मंदिरात उत्सवाच्या निमित्ताने सर्वांना एकत्र केले. देवांचे उत्सव मोठ्या थाटामाटाने साजरे केले. लोकांची धार्मिक अस्मिता जागृत करावी. एकदा हिंदू समाज संघटित झाला म्हणजे गमावलेले नीती धैर्य पुन्हा सापडेल अशी त्यांची खात्री होती. रामनवमी व हनुमान जयंती उत्सव समर्थांनी सुरू केले. चाफळला मोठ्या थाटामाटात रामनवमीचा उत्सव सुरू केला. जुन्या स्मशानभूमीत साऱ्या गावकऱ्यांच्या श्रमाने मंदिर उभारले. 'देव मस्तकी धरावा अवघा हलकल्लोळ करावा'. उत्सवासाठी येणाऱ्या लोकांसाठी धान्य, पैसे कसे उभे करणार या शंकेवर समर्थांनी दारोदार घरोघर जाऊन भिक्षा मागावयास सांगितले. एका रात्रीत २०५ मनाचे श्लोक तयार केले. दारासमोर उभे राहावे, श्लोक म्हणावा, 'सदा सर्वदा देव सन्निध आहे। कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे। सुखानंद आनंद कैवल्यधामी। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।' धान्याची रास जमा होऊ लागली. चाफळच्या मंदिरात समर्थांनी अंगलापूरच्या डोहात मिळालेल्या मूर्तींचीच प्रतिष्ठापना केली.

इकडे शिवबाने वयाच्या ७ व्या वर्षी स्वत:च्या कामगिरीला सुरुवात केली. 'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णु विश्ववंदिता शाहसूनो शिवस्यैषां मुद्रा भद्राय राजते' ही राजमुद्रा व 'मर्यादेयं विराजते' ही मोर्तब सिद्ध झाली. पुण्यात कार्य सुरू झाले. कसबा गणपतीचा जीर्णोद्धार झाला. शेतकरी बांधवांना बी, बियाणे, नांगर, मोट, बैल अशी सारी सामग्री देऊन ज्या ठिकाणी बादशहाने गाढवाचा नांगर फिरवला होता त्याच ठिकाणी सोन्याचा नांगर फिरवून सारी भूमी सुजलाम् सुफलाम् केली.

आपल्या सवंगड्यांसह स्वराज्याची शपथ घेतली. पुण्याच्या लाल महालात दरबार भरू लागला. जनतेला न्याय मिळू लागला. संतुष्ट, समाधानी स्त्री ही शिवबाच्या स्वराज्याची संपत्ती होती. त्यामुळे शिवबाला आयाबहिणींचे आशिर्वाद लाभले.

शिवबाने प्रथम तोरणा घेतला. त्या गडाच्या दुरुस्तीत भरपूर संपत्ती मिळाली. तोरण्यानंतर एका पाठोपाठ एक असे अनेक किल्ले शिवबाच्या स्वराज्यात आले. ही सारी बातमी आदिलशहापर्यंत गेली. त्याने शहाजीराजांना अटक केली. स्वराज्यावरचे हे पहिले संकट. स्वराज्य की मातेचे सौभाग्य? राजे गोंधळले. याच वेळी शिवबांवर फत्तेखान चाल करून येत होता. त्याला पराभूत करावे तर शहाजीराजेंच्या जीवास धोका होता आणि त्याला शरण गेले तर स्वराज्यास धोका.खूप विचारांती जिजाऊने भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ या विचाराने फत्तेखानास परत पाठविण्यासाठी शिवबाला आशिर्वाद दिले.

राजे पुरंदरावर आले. फत्तेखानकडून शिरवळचा किल्ला परत मिळवला व विश्रांती घेत असलेल्या फत्तेखानच्या फौजेची कत्तल केली. फत्तेखान परत गेला. मात्र राजे चिंतेत होते. शहाजीराजेंच्या मृत्यूची टांगती तलवार डोक्यावर होती. संकटाशी झुंजतांना थोरा, मोठ्यांचे, भगवंताचे आशिर्वाद पाठीशी हवेत या विचाराने

जिजाऊने शिवबास तुकारामांचे दर्शन घेण्यास पाठविले.

शिवबा तुकारामांच्या दर्शनास आला. त्याने त्यांच्या पायी मस्तक ठेविले. दक्षिणेचे तबक समोर ठेवले. पण 'हे धन आम्हा मृत्तिकेसमान' असे म्हणून तुकारामांनी सारे धन गोरगरीबांस वाटून टाकावयास सांगितले. हे वैराग्य पाहून शिवबा भारावले. तुकारामांनी आपणास अनुग्रह द्यावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. तेव्हा तुकारामांनी त्यांना समर्थांची माहिती सांगितली व त्यांचा आशिर्वाद घेण्यास सांगितले.

शिवबाच्या मनास समर्थांचा ध्यास लागला होता. इकडे समर्थांनाही शिवबाच्या भेटीची अनिवार इच्छा झाली होती. दोघांचे नेतृत्व करत होता भगवा ध्वज. भगवा हे त्यागाचे प्रतीक. शिवबा आणि समर्थ दोघेही मनाने सन्यस्त. समर्थ हे योद्धा सन्यासी तर शिवबा सन्यस्त योद्धा. शिवाजी महाराज आशिर्वादासाठी एका साक्षात्कारी पुरुषाच्या शोधात होते तर समर्थ एका सत्प्रवृत्त राजाच्या शोधात होते की जेणेकरून त्यांना त्याच्या भूमीवर स्वधर्माची उपासना करणारे नागरिक निर्माण करता येतील. शिवाजी महाराज अध्यात्माधिष्ठित राजकारण करणारे तर समर्थ राजकारणाचे अध्यात्मीकरण करत होते. दोघांचे विचार परस्पर पूरक होते. हे दोघे एकत्र येणे आवश्यक होते आणि तो योग लवकरच जुळून आला. चंद्रराव मोरेंना भेटण्यासाठी शिवाजी राजे वाईस गेले होते. समर्थांच्या मठांच्या जाळयामुळे शिवबाच्या साऱ्या हालचाली समर्थांना समजत होत्या. समर्थांनी आपले दोन शिष्य दिवाकर गोसावी व उद्धव गोसावी यांस वाईला पाठवले व सोबत राजांना एक पत्र दिले.

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी ॥----

पुढे समर्थ लिहितात 'तुमचे देशी वास्तव्य केले। परंतु वर्तमान नाही घेतले। ऋणानुबंधांचे विस्मरण झाले, काय नेणू।'

राजांचे डोळे भरून आले. पत्र वाचताच राजे ३०० घोडेस्वारांसह चाफळला पोचले. अध्यात्म विद्येचा शांत शीतल चंद्र म्हणजे समर्थ तर प्रखर क्षात्रवृत्तीचा तेजोभास्कर छत्रपती शिवाजी महाराज. येथून पुढे ३० वर्षे दोघा महापुरुषांनी एकत्रितपणे स्वधर्म व स्वराज्याचा विस्तार केला.

समर्थांच्या मनात सशस्त्र क्रांतीची कल्पना खोलवर रुजली होती आणि म्हणून श्रीराम, मारुती, तुळजाभवानी ही त्यांची दैवतेदेखील सशस्त्र होती. सन १६५२ मध्ये समर्थ शिवथर घळीत आले. तेथून कोसावरच चंद्रराव मोऱ्यांचा वाडा होता. चंद्रराव मोरे आदिलशहाशी एकनिष्ठ. तेव्हा त्यांचेवर लक्ष ठेवणे. प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेला अफझलखानचा वध आणि एकांतात दासबोध लेखन यासाठी घळीतील वास्तव्य महत्त्वाचे ठरले.

घळीमधे समर्थांनी मठ स्थापन केला. गणेशमूर्तीची स्थापना केली. त्या काळात महाराष्ट्राच्या दोन राजधान्या होत्या. एक होते शक्तीपीठ व एक होते युक्तीपीठ. एक होती राजकीय राजधानी व एक होती वैचारिक राजधानी. एकीचे नाव किल्ले रायगड, एकीचे नाव शिवथर घळ. हरहर महादेवची गर्जना करणारे सैनिक गनिमी काव्याने शत्रूचा नि:पात करत होते तर घरोघर भिक्षेच्या निमित्ताने जाउन रामदासी लोकांना धीर देत होते.

समर्थ सांगत होते, 'मुख्य हरिकथा, दुसरे ते राजकारण तिसरे ते सावधपण सर्व विषयी। चवथा अत्यंत साक्षेप, फेडावे नाना आक्षेप, अन्याये थोर वा अल्प, क्षमा करित जावे॥ धटासी आणावा धट उद्धटाशी उद्धट। खटनटासी खटनट, अगत्ये करी॥

अफझलखानाला प्रतापगडाच्या पायथ्याशी मारला. त्या भोवतालच्या ठिकाणी समर्थांचे मठ होते. समर्थांनी आपल्या शिष्यांकरवी पुरंदरावर महाराजांना संदेश पाठविला होता. तो म्हणजे, 'राजकारण उदंड करावे. पण

कळोनी न द्यावे।' 'विजापूरचा सरदार निघाला आहे.' हा संदेश प्रत्येक चरणाच्या अद्याक्षराने समर्थांनी पाठविला होता. 'विवेके करावे कार्यसाधन। जाणार नरतनू हे जाणोन। पुढील भविष्यार्थी मन।रहातेची नये॥

प्रसिद्ध इतिहासकार द. वा. पोतदार म्हणातात, ज्या ज्या ठिकाणी महाराजांनी काही विशिष्ट पराक्रम केला त्या त्या ठिकाणी समर्थ मठाचे जाळे पहायला मिळते. आग्र्याहून सुटल्यावर महाराज रायगडावर सुखरूप पोचले ते ही जागोजाग समर्थांचे मठ व शिष्य होते त्यामुळेच. समर्थांचे सारे राजकारण अत्यंत सावधानतेने चालले होते. ही सावधानता नसती तर समर्थांचे मठ दिल्लीच्या बादशहाने किंवा विजापूरच्या अदिलशहाने केव्हाच उध्वस्त केले असते.

समर्थ अत्यंत नि:स्पृहपणे हे कार्य करीत होते व तसेच आपल्या शिष्यांनी वागावे असा त्यांचा कटाक्ष होता. सेतु माधवराव पगडी यांच्या समर्थ संप्रदाय या पुस्तकात एक कथा आहे - महाराज विषमज्वराने आजारी होते त्यावेळेस ते साताऱ्याला होते. समर्थ घळीत होते. त्यांनी महाराजांसाठी कल्याणाकरवी तीर्थ पाठवले. महाराजांना खूप आनंद झाला. महाराज कल्याणास म्हणाले 'काही सेवा असली तर सांगा' कल्याण तसे नि:स्पृह पण त्यांनाही मोह झाला. त्यांनी आपल्या धाकट्या भावासाठी ११ गावी मागितल्या. महाराजांनी त्यांची मागणी तात्काळ पूर्ण केली. आपल्या भावाचे काम केले या आनंदात कल्याण खाली घळीत परत आले व त्यांनी सारा वृत्तांत कथन केला. समर्थ संतापले व प्रथमच आवडत्या शिष्यावर रागावले. 'आजवर आमच्या सहवासात राहून हेच का आम्हाला ओळखले? आर्जववृत्ती हा नि:स्पृहाचा धर्म नव्हे. तोंड वेंगाडून तुम्ही गाईंची भीक का मागितली?'

पुढे एकदा रामनवमी उत्सवासाठी महाराजांकडून शिधा आला तो समर्थांनी परत केला. कदाचित कल्याणस्वामींच्या गुन्ह्याचे प्रायश्चित म्हणून त्यांनी हे केले असावे.

समर्थांनी शिक्षेच्या माध्यमांतून राष्ट्रीय एकात्मता जोपासली. रामराज्य हे समर्थांचे स्वप्न होते. महाराष्ट्रात हिंदूंचे सिंहासन निर्माण व्हावे ही अंतरीची तळमळ होती. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला त्यावेळी समर्थ रायगडावर नव्हते हे देखील सावधानतेचा एक भाग म्हणूनच. समर्थांनी समाजसंघटनेला आपल्या कुटुंबापासून आरंभ केला. आदर्श नागरिक हा कुटुंबात तयार होतो. परंतु इस्लामी आक्रमणामुळे पत्नी पळवून नेली गेली म्हणून संन्यास घेणे हा पुरुषार्थ नाही आदर्श कुटुंबसंस्था निर्माण करून देशावर प्रेम करणारी आदर्श प्रजा निर्माण केली पाहिजे.

आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका।येथे आळस करू नका। विवेकी तो प्रपंच सांडून परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायाला मग तया करंट्याला। परमार्थ कैसा

गरीबी हटवण्यासाठी सर्वसामान्य लोकांना उद्योगप्रिय बनवले पाहिजे हे समर्थांना पटले होते.

आधी कष्ट मग फळ। जे कष्टचि नाही ते निर्फळ
साक्षेपेविण केवळ। वृथा पुष्ट

पण संतांनी समाज निष्क्रीय केला, लोकांना दैववादी बनवले असे आरोप करणाऱ्यांनी समर्थांचा प्रयत्नवाद, पढतमूर्ख लक्षणे वाचली पाहिजेत.

पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण
तो दुरात्मा दुराभिमान। मत्सरे करी

छोटे कुटुंब सुखी कुटुंब हा विचार देखिल मार्शलच्या लोकसंख्या सिद्धांताच्या आगोदर दासबोधात आहे.

लेकुरे उदंड जाली तो ते लक्ष्मी निघोनी गेली

प्रार्थना म्हणजे आत्म्याच्या अगाध शक्तीला जागृत करणारे दैवी बल आहे.

बापडी भिकेसी लागली। काही खाया मिळेना

दोन मुलांमधे अंतर असावे -

लेकुरे खेळती धाकुटी। येके रांगती येके पोटी
ऐसी घरोघरी झाली दाटी। कन्या आणि पुत्रांची

तेव्हा रडत खडत प्रपंच समर्थांना मान्य नाही. भविष्यकाळचा विचार करून पैसे साठवावे. पूर्वी सोन्याच्या रुपात लोक बचत करीत असत. त्या दृष्टीने 'प्रपंची पाहिजे सुवर्ण' असा संदेश समर्थ देतात. याचबरोबर आपण समाजाचेही काही देणे लागतो. आवश्यकतेपेक्षा जे जास्त आहे ते गरजूंची देणे हे ही आपले कर्तव्य आहे. लहान लहान मुलांना प्रेमाने गोड बोलून जवळ करावे, सर्वांशीच गोड बोलावे असा संदेश सामाजिक कार्य करणाऱ्या प्रत्येकालाच समर्थांनी दिला. जिभेवर खडीसाखर व डोक्यावर बर्फाचा खडा हवा असे ते म्हणत.

शिवरायांच्या राज्याभिषेकानंतर समर्थ सज्जनगडावर रहावयास गेले. तेथे गेल्यावर ६ महिन्यांनी गंगाधर स्वामी गेले. त्यानंतर समर्थांची मानसकन्या वेण्णा हिचा देखिल मला 'माहेरी' पाठवा असा आग्रह होता. त्यामुळे समर्थ विषण्ण झाले. पुढे चैत्र शु. पौर्णिमेस ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे निधन झाले. समर्थ आणि शिवाजी ही शरीरे दोन होती पण आत्मा एकच होता. समर्थ खूप कष्टी झाले. त्यांनी अन्न पाणी वर्ज्य केले पण शिष्यांच्या आग्रहामुळे दूध व फळे घेऊ लागले. पण रायगडावरच्या बातम्यांनी चित्त उद्विग्न होऊ लागले. अखेर संभाजी महाराजांना राज्याभिषेक झाला. समर्थ इकडे निरवानिरव करीत होते. त्यांनी संभाजीराजेंना संदेश पाठवला. 'शिवरायाचे आठवावे रूप, शिवरायाचा आठवावा साक्षेप। शिवरायाचा आठवावा प्रताप। भूमंडळी। शिवरायाचे कैसे चालणे। शिवरायाचे कैसे बोलणे। शिवरायाचे सलगी देणे कैसे असे।'

पुढे माघ वद्य नवमी - २२ जाने. १६८२ हा दिवस समर्थांनी देहत्यागासाठी निश्चित केला. आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, लो. टिळक, स्वा. सावरकर, गोखले, डॉ. हेडगेवार गुरुजी या व यासारख्या अनेक देशभक्तांनी समर्थांकडून प्रेरणा घेतली.

आणि म्हणून अशी व्यक्तिमत्त्वे अनंत काळ सर्वांनाच प्रेरणादायी ठरतात. सावरकरांच्याच शद्वात सांगायचे झाले तर 'अनेक फुले फुलती। फुलोनिया सुकून जाती। कोण तयांची महती गणती ठेविली असे पेरंगे गजेंद्र शुंडेने उपटिले। श्री हरींसाठी नेले। कमळपुष्प ते अमर जाहले मोक्षदायी पावन।

**सौ. मीरा लिमये**
विश्वगिरी, विष्णूनगर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४० ७६ २५

●●●

**संगमरवर की गालिचा**

आग्र्याच्या इतिमद उद दौलाच्या कबरीमध्ये मुघल शिल्पकारांनी संगमरवरामध्ये एक आश्चर्य घडवलं आहे. तिथली संगमरवराची फरशी त्यांनी कोरून इतकी मऊसूत बनवली आहे की जणू एक मऊशार गालिचा अंथरला आहे. या कबरीतील मिझा घियास बेग इतिमद उद दौला व त्याची पत्नी (नूरजहाँचे माता-पिता) यांची थडगी ही अशीच एक करामत आहे. पिवळ्या संगमरवराला शिल्पकारांनी असं काही पॉलिश केलं आहे की ती लाकडीच वाटावीत.

# इंद्रधनुष्य आणि सोन्याचा हंडा

लीला जोशी

'नशिबाचा फेरा फिरला' की माणसावर ओढवणाऱ्या परिस्थितींची कल्पना देणारी एक चटकदार कथा. -संपादक

आमचे घराणे मूळचे पंजाब मधले. माझे आजोबा उद्योगधंदा करण्यासाठी अमेरिकेला आले आणि मग सगळे कुटुंब इथेच अमेरिकेत स्थायिक झाले. अतिशय सधन कुटुंबात माझा जन्म झाला. घरची आर्थिक परिस्थिती उत्तम होती. मला भरपूर पॉकेटमनी मिळायचा. खाना पिना, मजा करना अशी माझी वृत्ती होती.

लहानपणापासून मला लॉटरीचे वेड होते. मी सदैव बोनस स्टँप, आकर्षक बक्षिसे यांच्या शोधात असायचा. मी कशावर पण पैज लावत असे. मोटारींचे नंबर, पावसाचे थेंब, उडणारी पाखरे - पैज मारायला मला कोणतीपण गोष्ट चालत असे. 'I bet' (लागली पैज!) हे शब्द सतत माझ्या जिभेवर खेळत असत. मला भरपूर मित्रमंडळी होती. आईवडिल दोघेही बिझिनेसच्या कामात गुंतलेले. दुपारी शाळा सुटल्यावर रिकाम्या वेळात आम्ही मुले, व्यापारडाव, रमी, रोले वगैरे खेळ खेळत असू. शाळकरी विद्यार्थी असतांनाच मी बाऊलिंग ॲलीमध्ये जाऊन पैसे मिळवायला सुरुवात केली. माझं नशिब जोरदार असायचं. भरपूर पैसे हातात खेळायला लागले. वडिल क्लबमध्ये पत्त्यांचा जुगार (Card-games) खेळायचे. पण आपल्या मुलाच्या कर्तबगारीचा त्यांना मुळीच पत्ता नव्हता!

माझे शालेय शिक्षण व्यवस्थित पूर्ण झाले. पण अभ्यासापेक्षा स्पोटर्स्‌ बेटींग, स्टॉकमार्केट यातच मला जास्त रस असे. लवकरच मी घोड्यांवर पैसे लावायला लागलो. मला इतरांसारखे ठराविक चाकोरीतले आयुष्य जगायचे नव्हते. तरुणपणी भरपूर पैसा मिळवायचा आणि मग स्वस्थपणे आरामात बसून खायचे हे माझे स्वप्न होते. लहानपणी मी एक गोष्ट वाचली होती की जिथे इंद्रधनुष्याचा शेवट होतो, तिथे सोन्याचा हंडा सापडतो. इंद्रधनुष्याच्या टोकाला असलेला तो हंडा मला हवा होता.

कॉलेजमध्ये जाऊन मी पदवीधर झालो. बिझिनेस मॅनेजमेंटचा कोर्स पूर्ण केला. वडिलांच्या बिझिनेसमध्ये हिरीरीने भाग घेऊ लागलो. माझ्या कामावर वडिल खूष होते. आर्थिक व्यवहार आता माझ्यावरच सोपवले गेले. जुगारात लावण्यासाठी भरपूर पैसा हातात येत होता. अनेक ठिकाणांहून कर्ज मिळण्याची सोय देखील झालेली होती. स्वत:च्या हुषारीवर मी खूष होतो. दिवसभराच्या कामाचा आणि कमाईचा आढावा घेतांना रात्री माझ्या अंगावर मूठभर मास चढायचे. स्वप्नात मला इंद्रधनुष्याच्या टोकाला असणारा हंडा दिसायचा. मी त्या हंड्यावरून हात फिरवतोय असं दृष्य मला दिसायचं.

अचानक मला स्वप्नाला मोठा तडा गेला. मोटार अपघातात माझे आईवडिल ठार झाले. सगळी जबाबदारी माझ्या अंगावर पडली. घरात पत्नी आणि एक मुलगी होती. आईवडिलांचे छत्र डोक्यावर होते, तोपर्यंत घरचे काहीच मला बघावे लागत नव्हते. दोघेही अचानक वारल्यामुळे मी बराच विमनस्क झालो. स्वत:ला सावरण्याचा मी प्रयत्न करू लागलो. त्या काळात माझे दारू पिण्याचे प्रमाण वाढले.

माझा जिंकण्याचा काळ संपत आला आहे असे मला वाटू लागले. माझे नशिब फिरले. आवक कमी होऊ लागली आणि कर्जाचे डोंगर वाढत गेले. आतापर्यंत मी सर्वांशी प्रामाणिकपणे पैशाचे व्यवहार केले होते, पण आता

दुष्टांच्या संगतीत सदाचार लोप पावतात.

मी लांड्यालबाड्या करू लागलो. माझा खरोखरच नाईलाज झाला होता. मी बेटींगमध्ये बराच मार खाल्ला होता. माझे आडाखे चुकले होते. वायदेबाजारात मला फार मोठी खोट बसली होती. पराभवाच्या दुःखाने मी तडफडत होतो. गेलेले पैसे मिळवण्यासाठी पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत होतो. माझ्यातला सैतान जणू जागा झाला होता, माणूस मेला होता.

मला आठवतं की माझी पत्नी दुसऱ्यांदा गर्भवती होती. तिच्या पोटात दुखायला लागलं तेव्हा मी तिला हॉस्पिटलमध्ये रात्री पोहोचवलं. तिची आई तिच्याजवळ होती. तरीपण तिची प्रकृती ठीक नसल्याने ती घाबरली होती. 'आजची रात्र तुम्ही इथेच माझ्याजवळ थांबा', असं ती डोळ्यात पाणी आणून विनवत होती, पण मी कामाची सबब सांगून तिथून सटकलो आणि सरळ जुगाराच्या अड्ड्यावर गेलो. पहाटे मी पुन्हा हॉस्पिटलमध्ये गेलो. मला मुलगा झाला होता. पण पुत्रप्राप्तीचा आनंद मला झाला नाही कारण मी जुगारात हरलो होतो! आज त्या प्रसंगाच्या आठवणीने देखिल मला शरम वाटते.

लक्ष्मी माझ्यावर रूसून निघून जात होती. मी हतबल झालो होतो. निकराचे प्रयत्न करूनही गेलेला पैसा परत मिळवणे अशक्य झाले होते. घेणेकरी मानगुटीवर येऊन बसले होते. मनावर प्रचंड दडपण आले आणि ३५ व्या वर्षी मला हार्ट अॅटक आला. दोन आठवडे मी हॉस्पिटलमध्ये होतो. मी पार कोसळलो होतो.

घरी आल्यावर काही दिवस मी जुगारापासून अलिप्त राहिलो. पण माझा निश्चय फार काळ टिकला नाही. सट्टा, रेस, पत्ते - दुष्ट चक्र पुन्हा सुरू झाले. पैशाची आवक - जावक चालू झाली. माझी पत्नी दोन्ही मुलांना घेऊन तिच्या आईच्या घरी गेली. तिने आणि तिच्या भावाने परोपरीने सांगितले तरी मी अनामिक जुगारी (Gamblers Anonymous) मध्ये जाण्याचे नाकारले. मला काही प्रॉब्लेम आहे हे मी मुळीच मान्य करायला तयार नव्हतो. मी अहंपणाच्या धुंदीत वावरत होतो. बिचारी पत्नी उपासतापास, पूजा, व्रते वगैरे करीत होती. आला दिवस निभावून नेत होती.

शेवटी मात्र माझे अवसान गळाले. मी शरणागती पत्करली. एका मित्राबरोबर जी.ए.च्या मीटिंगला गेलो. माझी पत्नीच मला तिथपर्यंत सोडायला आली होती. तिथल्या मीटिंगचे एकंदर स्वरूप पाहून मी चकितच झालो. मटका खेळणारे, तीन पत्ते खेळणारे, रेसचा नाद असलेले, स्टॉकमार्केटमध्ये आपटी खाल्लेले, सगळ्या प्रकारच्या जुगारात दणकून मार खाल्लेले २०-२५ मंडळी त्या ग्रुपमध्ये होती असे मित्राने मला सांगितले.

मीटिंगला आरंभ झाला. अनुभव कथन सुरू झाले. पन्नाशीला पोहोचलेल्या एका उंच, दणकट माणसाने आपल्या आयुष्याचा पाढा वाचला आणि मी मनाशी म्हणालो, 'अरे, ही तर माझीच गोष्ट हा माणूस सांगतोय.' 'त्याची' गोष्ट ही 'माझी' गोष्ट होती. तुरुंगाची हवा खाऊन आलेली अनेक मंडळी मोकळपणाने बोलत होती. त्यांचे बोलणे ऐकून मला धीर आला होता. माझ्यासारखेच गोल्ड रशमध्ये सामील झालेले ते सारे प्रवासी होते. सोन्याचा हंडा शोधतांना दमछाक होऊन शेवटी सगळेजण जी.ए. मध्ये येऊन थडकले होते.

चाळीसाव्या वर्षात बहुतेकजण आयुष्यात स्थिरावलेले असतात. त्यांच्या संसाराचा पाया पक्का झालेला असतो. पण मी मात्र चाळीसाव्या वर्षी जी.ए. मध्ये येऊन दाखल झालो होतो. हातात कोरी पाटी घेऊन धडे घेत होतो.

आज मी पन्नाशीच्या घरात येऊन पोहोचलोय. आयुष्याला नवी दिशा मिळाली आहे. जी.ए. च्या मीटिंगला नियमितपणे येत आहे. माझ्या सुधार कार्यक्रमात माझ्या पत्नीचे व मित्रमंडळींचे चांगले सहकार्य मला मिळत आहे. शेवटपर्यंत मला जी.ए. मध्ये यावेच लागणार आहे, कारण

---

कोवळे स्मितहास्य म्हणजे दुःखावरचे मलम होय.

इंद्रधनुष्याच्या टोकाशी असलेला सोन्या हंडा शोधण्याची इच्छा मरेपर्यंत माझ्या मनात घर करून राहणार आहे हे मला ठाऊक आहे. जुगाराची उर्मी आटोक्यात ठेवण्यासाठी मी 'आजचा दिवस' जुगारापासून दूर रहात आहे.' I bet, लागली पैज' हे शब्द माझ्या तोंडातून मी हद्दपार केले आहेत.

('मुक्तीच्या कैफात' या आगामी पुस्तकातील एक प्रकरण.)

**श्रीमती लीला जोशी**
मनसुबा, राम गणेश गडकरी मार्ग,
ठाणे (प) - ४०० ६०२
दूरध्वनी : ५३३ ६६ ५४

***

**तरंगता खांब**

हवेत तरंगत्या खांबाविषयी तुम्ही ऐकलं आहे का? नसेल तर बंगलोरच्या उत्तरेला १०० कि.मी. वर लेपाक्षी नावाच्या खेड्यात जा. तिथल्या वीरभद्र मंदिरातील नाट्यमंडपाचे छत पहा. ते अशा खांबांवर विसावलय की ज्यातला एक खांब छतावरून लटकल्यासारखा वाटतो. जमिनीपासून तो १ इंच वर असून त्याच्या खालून काहीही म्हणजे कापड, कागद सुद्धा पार होऊ शकतो असे पूर्वी चार खांब होते असे म्हणतात. आता मात्र एकच खांब दिसतो.

*With Best Compliments From*

B. J. Investment
&
Consultant

C-29, Sumitra, Feno Nagar,
Louies Wadi, Thane
Tel. : 583 6733

हार्दिक शुभेच्छा !

श्रद्धा कन्स्ट्रक्शन

(गव्ह. कॉंट्रॅक्टर)

इमारत रिपेअरींग, पेंटींग, प्लंबींगची
कामे योग्य दरात व उत्तम दर्जाची
करून देतो.
व नवित कामांची अंदाजपत्रक
बनवून देतो.

आर. एन. देसले/प्रविण वाहेती
पी. डब्ल्यू. डी., प्रभातसमोर, ठाणे.
दूरध्वनी : ५३१ २७ ३४, ५३७ ११ ६०

# भ्रष्टाचार

सौ. वंदना सं. प्रसादे

*भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनलेल्या आजच्या समाजात कोणतीही कृती भ्रष्टाचारास कारणीभूत ठरत आहे . या विषयासंबंधी हे प्रकटचिंतन. - संपादक*

'दाम करी काम' हे तर आपण पावलोपावली अनुभवतो. पण याला खतपाणी घराघरातूनच घातले जाते. आपण बारीक - सारीक गोष्टीत पैसे देऊन आपले काम साध्य करतो आणि मग भ्रष्टाचाराच्या नावाने आरडाओरड करत राहतो. भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट असा आचार. घरी दारी आपल्यातील अनेकांना सवय असते पैसे टाकून कामे करून घ्यायची. समोरचा माणूस त्याचे काम करीत असतो. त्याचा त्याला मोबदला म्हणून पगार मिळत असतो परंतु त्यासाठी पैसे देऊन ते लवकर करून घेण्याची मनोवृत्ती वाढत चालली आहे. या गोष्टी स्वत: आचरणात न आणता पुढच्या पिढीकडून मोठ्या अपेक्षा ठेवण्याचा अधिकार आपल्याला कसा मिळणार.

पेरिलें ते उगवते। बोलण्यासारिखें उत्तर येतें।
तरी मग कर्कश बोलावें। तें कायें निमित्ते ॥

समर्थ रामदासांनी सांगितलेला हा निसर्ग नियम आहे. बीजाचे गुणधर्म फळात उतरतातच. मोहाच्या मृगजळात सापडलेला कुलीन मनुष्यही वाममार्गाकडे वळतो.

'सारी सोंगे आणता येतात पण पैशाच सोंग आणता येत नाही' आणि अशा या कधीही तृप्त न होणाऱ्या तृष्णेतून जन्माला येतो तो भ्रष्टाचार. पैशाची ताकदच एवढी आहे की त्याच्या तालावर सारं जग नाचतय. पैसा हा जगण्याचा मूलमंत्र झालाय.

गैरकानूनी काम करायला दाम मोजावाच लागतो आणि यातून हरवते ती शांत झोप आणि पाठीशी लागतात अनंत व्यसने. पैशाने कायदा विकत घेता येतो. पैशाने सरस्वतीची किंमत होतेय, मुले विकली जातात, तारुण्य विकले जाते. नोकऱ्या मिळवता येतात, देवाच्या दारातील दर्शनालाही पैसा फेकावा लागतोय. पण या सर्वात कामे होतात ती श्रीमंतांची, कारण त्यांना फेकावा लागणारा पैसा उपलब्ध आहे म्हणूनच.

सरकारी कचेरी असो वा कुठलीही संस्था, निवडणुका आल्या अथवा एखादी लस टोचा, माणसे विकली जात आहेत. बोफोर्स काय, चारा घोटाळा, आता तर मॅच फिक्सींग सामान्य माणसाच्या कल्पनाशक्ती पलिकडचे आहे सगळे! पैसा हेच सर्व सुखाचे धन झाले आहे.

माणसाच्या गरजा वाढल्या, अपेक्षा वाढल्या. वैज्ञानिक प्रगती झाली पण माणूस ऐहिक सुखाच्या मागे लागला. त्याच्या पूर्ततेसाठी हवा पैसा आणि तो मिळवण्याचा मार्ग कोणताही असो पैसा हवाच.

माणूस हा किती हिंसक प्राणी आहे. कारण या सर्व प्रकाराने पैसा मिळवूनही वर ताठ मानेने जगतो. या पैशासाठी वाटेत आलेल्यांना सहज चिरडले जाते. म्हणजे तोच खरा नरभक्षक.

हा भ्रष्टाचार नसानसात भरत चाललाय. आजकाल असं एकही क्षेत्र नाही जिथे भ्रष्टाचार पोहोचला नाही. गॅसवाला गॅस देतो, त्याला वर पैसे द्या. वाणी वजनात फसवतो, भाजीवाला माप मारतो, कंडक्टर सुटे पैसे देत नाही, प्रमोशनसाठी आणि व्यवसायात टेंडर पास

करण्यासाठी ओली पार्टी, स्वत:च्या मालमत्तेच्या व्यवहारात कागदपत्र नीट करण्यासाठी, प्रत्येक ठिकाणी पैसा हवा. प्रत्येक ठिकाणी फसवणूक चालूच असते. साधी गाडी रिपेअर करा फसवाफसवी आलीच. धान्यात भेसळ, नकली ५०० च्या नोटा, एवढेच काय तर आय. एस. आय. मार्क सुद्धा नकली बनवला जातोय. 'कष्टविण नाही फळ' असे आपले पूर्वज म्हणायचे. अहो आता त्याच कष्टात फळेच फळे. दुष्काळग्रस्त लोकांसाठी मदत गोळा केली जाते ती प्रत्यक्ष तेथे पोहोचते का? आपतग्रस्तांना मदत करताना मृत स्त्रीच्या हातात अडकलेल्या बांगड्या काढण्यासाठी तिचा हात कापला जातो. किती लोभीपणा माणसात आलाय?

राजरोसपणे भ्रष्टाचार चालतो. यातून राष्ट्राचे भवितव्य कसे असेल. आज आपली परिस्थिती अशी आहे 'कुंपणानेच शेत खाल्ले, तर दाद कुणाकडे मागायची'. पेपर फुटत आहेत, मुलांना ॲडमिशनसाठी हाल होत आहेत. पैसे टाकून मेरिटलिस्ट मिळत असेल तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्यांनी काय करायचे.

रस्ते दरवर्षी नवीन केले तर एका पावसात प्रचंड खड्डे पडत आहे. नवीन बांधलेले पूल वर्षातच खिळखिळे होत आहेत. औषधे खराब म्हणून कोणाचे अवयव निकामी होत आहेत. विषारी पदार्थांनी माणसे मरत आहे. परवा तर विषारी बाजरीने ४० मोर मेले. हे कुठपर्यंत चालणार. पूर्वीच्या आपल्या नेत्यांनी स्वसुखाची आणि संसाराची होळी करून स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले तेव्हा त्यांना त्या पदव्या मिळाल्या. माणसाला मोठे होण्यासाठी भ्रष्ट आचाराची आवश्यकता नसते असे पूर्वीच्या नेत्यांनी दाखवून दिले आहे पण आज सतत निवडून आलेल्या माणसाचे नाव कुठल्या न कुठल्या प्रकरणाशी जोडलेले असतेच.

संपूर्ण मानवजातीलाच ही कीड लागत चालली आहे. शिवरायांच्या बागेतील आंब्याला हात लावला म्हणून दादोजींना शर्टाला बाही न शिवण्याची शिक्षा होती. माधवरावांनी स्वत:च्या काकांनाच केलेले शासन. अशी अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. पण आता तर गुरूच भ्रष्ट व्हायला लागले तर शिष्य काय करतील? विद्यार्थ्यांनी अशा गुरूचे अनुकरण न करता अजूनही असे शिक्षक आहेत की जे जीव ओतून तुम्हाला घडवत आहेत त्यांचा आदर्श जतन करावा.

'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे.' सत्याचा मार्ग कठीण पण तोच स्वच्छ. 'जिथे राबती हात तेथे हरी.' प्रामाणिकपणे आपले कार्य करत राहणे. पैसा टाकून विश्वास विकत घेऊ नका. 'जो दुसऱ्यावर विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला.'

आजची पिढी या द्विधा मन:स्थितीतून जात आहे. तिला योग्य तो मार्ग दाखवणारे फार कमी आहेत. आपण एक विश्वास बाळगू की 'यदा यदा ही धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत। धर्म संस्थापनार्थाय्, संभवामि युगे युगे।' यातून मिळणारा संदेश म्हणजे जेव्हा जेव्हा सृष्टीवर अनाचार माजेल, धर्माला ग्लानी येईल, तेव्हा युगानु युगे कुठे तरी वाईटाचा नाश होऊन पुन्हा परमेश्वर आपणास साथ देईल. आपण असे स्वप्न पहात आहोत, एक दिवस तर पुढची पिढी म्हणेल, 'मज नकोत अश्रू घाम हवा!'

**सौ. वंदना सं. प्रसादे**
ठाणे.
दूरध्वनी : ५४० ०६ ५२

•••

---

निसर्गावर तुम्हाला प्रभुत्व हवे असल्यास निसर्गाचे नियम नीट पाळलेच पाहिजेत.

# आठवणीत राहिलेले सर

प्रा. मोहन पाठक

*शालेय जीवनात आपल्या भावविश्वावर अमिट ठसा उमटविणारे शिक्षक भेटणे हा तसा नेहमीचा अनुभव. सदर लेखात दिशाचे कार्यकारी संपादक प्रा. मोहन पाठक यांनी अशाच आठवणी शब्दबद्ध केल्या आहेत. खास दिवाळी अंकासाठी. - संपादक*

आम्हाला शाळेत मराठी शिकविणारे एक सर होते. (अर्थात एकेवर्षी त्यांनी भूगोलही शिकवला होता! हे आमच्या शाळांचं वैशिष्ट्यच आहे.) हे सर इंग्रजीत ज्या पद्धतीला Textual Method म्हणतात, त्या पुस्तकी पद्धतीने मराठी कधी शिकवायचे नाहीत. तरीही त्यांचा तास त्या वयात अतिशय हवा हवासा आणि संपू नये असे वाटायला लावणारा होता. पाठाच्या अनुषंगाने विविध विषयांवर सर्वस्पर्शी असं विवेचन करीत तो पाठ किंवा कविता शिकविण्याची त्यांची वेगळीच शैली होती. शालेय जीवनात आपलासा वाटलेला, आपल्या व्यक्तिमत्त्वावर खोलवर ठसा उमटवणारा, आपल्या शालेय जीवनातील बऱ्यावाईट आठवणींचा अविभाज्य भाग असणारा एक तरी शिक्षक वा शिक्षिका आपल्याला भेटते. त्या न कळत्या वयात एखादा न आवडणारा, न जमणारा विषय अशा शिक्षकांमुळे पटकन आवडायला लागतो. आम्हाला मराठी शिकविणाऱ्या या सरांच्या अध्यापन शैलीमुळे माझ्या मनात मराठी साहित्य व भाषा याबद्दल कायमची ओढ निर्माण झाली.

शिकवता शिकवता किस्से सांगणे, विनोद करणे ही त्यांची विशेष हातोटी होती. अनेक गमतीदार प्रसंग ते सांगत. त्यातली एक गोष्ट, जिचा शेवट ते 'ग्रुपफोटो!' या विशिष्ट पद्धतीने उच्चारलेल्या शब्दाने करीत. त्यांच्या या साध्याशा गोष्टीतून मी खूप विचार केला व नकळत त्यातून प्रेरणा घेत गेलो आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता अशा प्रकारे 'ग्रुपफोटोत' होऊ नये यासाठी प्रयत्नांच्या दिशा तपासत राहिलो.

सरांचं व्यक्तिमत्त्व आजही आठवतं. सर आज बरेच वृद्ध असतील. कोठे आहेत ते मला अंदाजे माहीत आहे. आपणहून त्यांना भेटायला जावं. त्यांना जुन्या आठवणींचा संदर्भ देत त्यांचा आशिर्वाद घ्यावा, असं गेल्या पंधरा वीस वर्षांत अनेकदा मनात आलं. पण मी गेलो नाही. माझ्या आठवणीतील सरांची प्रतिमा बदलेल, काळाच्या ओघात सरांमध्ये झालेले बदल मी स्वीकारू शकणार नाही, असं वाटत असल्याने असेल, मी सरांना भेटलो नाही. शालेय वयात माझ्या मनावर बिंबलेलं व्यक्तिमत्त्वच मला जपण्यासारखं वाटतं आणि 'ग्रुपफोटो' कथेचा आशयही!

देहयष्टी म्हणाल तर किरकोळ या सदरात मोडणारी, विद्यार्थ्यांवर प्रभाव पडेल याची मुतराम शक्यता नाही. पण सरांची शिकवण्याची हातोटी, थेट मनाचा वेध घेतील असे बोलके डोळे व प्रसन्न भाषा यामुळे सर शिकवत तेव्हा आम्ही मंत्रमुग्धच होत असू. स्वत: त्यावेळेला कविता करीत असल्याने असेल, वा राष्ट्र सेवादलाच्या संस्कारांमुळे असेल, सरांचे असणे काहीसे अव्यवस्थित असे वाटे. खडूने भरलेले पांढरे हात, क्वचित चेहऱ्याला लागलेला खडूचा रंग, एखादं तुटकं बटण... टक्कल पडायला झालेली सुरुवात व किरकोळ देहयष्टी! स्वत:च्या नीटनेटकेपणाबद्दल काहीसे बेपर्वा पण भाषेच्या नीटनेटक्या वापराबद्दल आग्रही. काही दात पुढे आलेले. कधीतरी दाढीचे खुंटही.

पण तरीही स्वभावात साने गुरुजींच्या संस्कारातून

रुजलेली विलक्षण माया. बालकवींची औदुंबर त्यांनी साहित्य संघाच्या साहित्य प्रबोधच्या वर्गात शिकवली ती संध्याकाळ विसरता येणार नाही इतकी सुरेख! सरांनी औदुंबराचं, ऐलतटाचं, पैलतटाचं काढलेलं चित्र मनाच्या खोल आठवत रहातं. सरांची चित्रकला खूपच छान होती हे तेव्हा कळलं. विद्यार्थ्याला कळेपर्यंत शिकवायचं, जीव ओतून शिकवायचं, तरीही शिकवण्याचं ओझं वाटू द्यायचं नाही ही त्यांची खासियत.

ते सांगत ती गोष्ट, 'जन्माला आला हेला...' या नावाची होती असं म्हणता येईल. ती गोष्ट ते अशी सांगत, ''तुम्ही आम्ही जन्माला येतो. जन्माला आलो म्हणून कौतुकाने किंवा नाक मुरडत आपलं बारसं केलं जातं. बारसं झालं की आपल्या अस्तित्वाला चारचौघांच्या दृष्टीने काही अर्थ प्राप्त झाला असं आपलं चारचौघांना वाटतं. मग यथावकाश गळणारी चड्डी सावरत आणि रडण्याने नाकातून वहाणारं पाणी शर्टाच्या बाहीला पुशीत आपण कुठल्या तरी बऱ्या वाईट (!) शाळेला जायला लागतो. तेथेही फार काही न करताही वर्ष पदरात पडत जातात, आपण पुढे सरकत जातो. मग आपलं एस्. एस्. सी. (त्यावेळी 'सकाळ संध्याकाळ क्लासेस' या शब्दाचा हा शॉर्टफॉर्म आहे असं आम्ही मानायचो)नावाचं वर्ष येतं. तेही आपण पदरात पाडून घेतो. मग जमलं तर कॉलेज नावाची टंगळमंगळ किंवा एखाद्या नोकरीत चिकटतो. मग यथावकाश 'मला करायचं नाही' ही भीष्म प्रतिज्ञा करीत व 'कशाला कशाला...' म्हणत चतुर्भुज होतो. मग साहजिकच मूल होतं... मग बारसं, शाळा, वगैरे. मग आपलं म्हातारपणही चोर पावलानं येतं. घराच्या भिंतीवर टांगलेला फोटो आपल्या नातवंडांना दाखवीत मिचमिच्या डोळ्यांनी आपण सांगतो, ते ते पलीकडच्या रांगेतले किनी तुझे पणजोबा... तात्पर्य काय, शेवटी उरतो तो ग्रुपफोटो व त्यातलं आपलं बारीकसं चित्र. या पलीकडे आपण आयुष्यात काय करतो?'' ही गोष्ट झाल्यावर सर सांगत, ''या ग्रुपफोटोच्या पलीकडे तुमचा ठसा उमटणारं काही तरी करा. हेल्यासारखं गत होऊ देऊ नका. हेला काय, जन्माला येतो. वहा वहा पाणी वहातो आणि एक दिवस संपून जातो. त्यापेक्षा काही वेगळं करा.''

सरांची गोष्ट खूप आवडायची, पटायची. आजही एकसुरी जगणारी अनेक जीवने पहातो. वर्षामागून वर्षे जात रहातात पण जीवनाचा ठेका न बदलता जीवन जगणारी माणसं पहातो, तेव्हा 'ग्रुपफोटो!' हा शब्द आठवतो, सर आठवतात. एखादा ग्रुपफोटो काढतांनाही वाटत राहतं भिंतीवर हा फोटो नकोच लावायला. चौकटीच्या बाहेर गणलं जाईल असं काहीतरी करावं.

या आमच्या ईनामदार सरांचं आणि बालमोहन शाळेचं खूप ऋण आहे माझ्यावर, असं नेहमी जाणवतं. थोडसं, एक टक्का तरी काहीतरी वेगळं करण्याची प्रेरणा सरांच्या गोष्टीतून नकळत रुजली. अशक्य नावाचा शब्द नसतो हे शाळेनं शिकवलं. त्यामुळे त्या संस्कारांचं गाठोडं घेऊन वेगळं काहीतरी 'ग्रुपफोटो'च्या पलीकडचं करत रहातो. वाचन, लेखन, चिंतन आणि परोपकाराचा प्रयत्नही!

सर, आज तुम्ही कसे आहात माहीत नाही. शाळा संपली आणि दिशा वेगळ्या झाल्या. पण प्रेरणा देणारे तुमचे मराठीचे अध्यापन आणि तुमच्या तासातल्या कित्येक आठवणी अजूनही जाग्या आहेत. शिक्षक संपत नाही. तो विद्यार्थ्यांच्या मनात जिवंतच रहातो असं म्हणतात. त्याचा अर्थ तुमच्या आठवणीतून अधिक समजला!

**प्रा. मोहन पाठक**
ग्रंथपाल, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे - ४००६०१
दूरध्वनी क्र.५३३७६७२

०००

# व्यंगचित्र काय असतं

व्यंगचित्र काय असतं ॥धृ॥
हसऱ्या चेहऱ्यात भलमोठ
ध्यान असतं
दिसत तसं नसतं
म्हणून जग फसतं
असं सांगणारं खरखुर
एक पान असतं
व्यंगचित्र काय असतं ॥१॥

आडव्या तिडव्या रेषांत
लपलेलं एक फूल असतं
कल्पनेच्या रंगात रंगलेलं
अभिनव विचारांच्या
झोपाळ्यात झुलणारं
त्या चित्रकाराचं मूल असतं
व्यंगचित्र काय असतं ॥२॥

मनाची भरारी
दुःखाची शहारी
विषयांची मांडणी
आचारांची बांधणी
एकाच चौकोनात
मनातून हसवते
व्यंगचित्र काय असतं ॥३॥

डोळ्यातला पाऊस
जगण्यातली हाऊस
रेल्वेचा प्रवास आणि
मंतरल्याचा आभास
या सर्वांचाच निवास
यातच सापडायचा
व्यंगचित्र काय असतं ॥४॥

मंत्र्यांची बडबड
गरीबांची धडपड
इथच दाखवायची
हसत खेळत
विषयाची बाग
इथच फुलवायची
व्यंगचित्र काय असतं ॥५॥

शद्ब जिथे अपुरे पडतात
आकाशलाही जेव्हा साद घालतात
कुंचला तिथं पुढे जातो
वळण आणि रेघोट्यांनी
एकाच चौकोनात सारं
मांडून जातो
मनालाही हळुवार
फुलवून जातो
व्यंगचित्र काय असतं ॥६॥

**- संजय रूळे**

**ध्वनी निर्माण करणारे खांब**

मद्रासपासून ७६ कि. मी. वर असलेल्या कांचीपुरम् येथील वरदराजस्वामी मंदिरात १०० स्तंभांचं एक सभागृह आहे. एकाच मोठ्या पाषाण शिळेतून कोरून काढलेले हे खांब नादही निर्माण करतात. एकाच खांबाच्या वेगवेगळ्या भागांवर हाताने ठोकले असता वेगवेगळे ध्वनी निर्माण होतात. साधारण १५३० च्या सुमारास हे खांब घडवले गेले असावेत.

# परिसर वार्ता

सौ. विशाखा देशपांडे

आजचे युग हे संगणक युग आहे. दर दिवशी इथे विद्यार्थ्यांमधील चुरस वाढत आहे. आपल्या बुद्धिमत्तेला जास्तीत जास्त वाव मिळणे आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या भरपूर पैशासाठी झटणे यासाठी सतत प्रयत्नशील आहे आजची तरुण पिढी. महत्वाकांक्षा खूप आहेत परंतु योग्य मार्गदर्शनाअभावी ती भरकटण्याची शक्यताही नाकारता येत नाही. आजच्या तरुण मंडळींचा संगणक शिक्षणाकडे जास्त ओढा आहे. माहिती तंत्रज्ञान आणि त्याची जाणकारी ही या तरुण पिढीची गरज आहे. जगातील प्रत्येक राष्ट्रातील बदल, प्रगती, घडामोडी यांच्याशी स्पर्धा करायची आहे. त्यासाठी संगणक क्षेत्राची अत्याधुनिक माहिती असणे आणि त्यासाठी स्वत:चा संगणक असणे अत्यंत जरूरीचे आहे. पण त्याचबरोबर ही तरुण पिढी नुसतीच सुशिक्षित न होता सुसंस्कृतही झाली पाहिजे. ज्यासाठी त्यांच्यावर 'राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व' याचे संस्कार व्हायला हवेत. वरील दोन्ही बाबी ही काळाची गरज आहे. आणि म्हणून समाजामध्ये, विद्यार्थ्यांमध्ये याची जागृती घडविण्याच्या दृष्टीने विद्या प्रसारक मंडळ अनेक उपक्रम राबवित असते. त्या उपक्रमांचाच भाग म्हणून हल्लीच झालेल्या माहिती तंत्रज्ञान प्रदर्शनाचा व भावे राष्ट्रीय व्याख्यानमालेचा आढावा घेऊन इतर अनेक छोट्या मोठ्या बातम्यांसह ही 'परिसर वार्ता' सादर करीत आहे.

## 'मेलेनियम इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी प्रदर्शन'

दि. १३ ऑक्टोबरचा दिवस म्हणजे वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनासाठी अपुर्वाईचा व अनन्य साधारण महत्वाचा दिवस होता. तंत्रनिकेतनातर्फे आयोजित 'मेलेनियम इन्फॉर्मेशन टक्नॉलॉजी प्रदर्शना'चा उद्घाटन सोहळा या दिवशी मोठ्या थाटामाटात व अत्यंत अभिनव तंत्राचा वापर करून पार पडला. युवा पिढीला माहिती तंत्रज्ञानाची इत्थंभूत माहिती देण्याच्या उद्देशाने तज्ञ शिक्षकांनी मोठ्या कष्टाने व मेहनतीने हे आयोजन केले होते. मान्यवर औद्योगिक संस्थांच्या प्रतिनिधींनी या प्रदर्शनात भाग घेतला होता. या प्रदर्शनामुळे ज्यांना संगणक किंवा त्याचे भाग खरेदी करण्याचे आहेत, संगणक कर्मचारी ज्यांना नवीन सॉफ्टवेअरची गरज आहे, ज्या विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कर्तृत्व दाखवायचे आहे, अशांच्या गरजा पुऱ्या करणारी माहिती उपलब्ध करून देण्यात आली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञान व संसदीय कामकाज मंत्री माननीय प्रमोद महाजन उपस्थित होते. या प्रसंगी बीजभाषण वक्ते म्हणून 'अॅप्टेक'चे संचालक श्री. उल्हास पागे यांना आमंत्रित केले होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. किर्ती आगाशे यांनी केले. पहिल्या आशियाई स्पर्धा जेव्हा भारतात भरविल्या गेल्या तेव्हा पं. रविशंकरांनी एक स्वागतगीत संगीतबद्ध केले होते. तेच गीत 'अथ स्वागतम्। शुभ स्वागतम्', तंत्रनिकेतनाचे विद्यार्थी अभिषेक पाळंदे, दिप्ती देशमुख आणि स्नेहा केळकर यांनी याप्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सादर केले. त्यांना संगीत साथ केली होती श्री. पुराणिक व सचीन पाध्ये यांनी.

यानंतर प्राचार्य श्री. मुजुमदार यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत केले. याप्रसंगी प्रास्ताविक करताना श्री. मुजुमदार यांनी सांगितले की मंडळाचे कोषाध्यक्ष कै. रा. कृ. गोखले यांच्यावर १९८३ साली तंत्रनिकेतनाची जबाबदारी टाकल्यानंतर त्यांनी लावलेल्या रोपट्याचा आता वटवृक्ष झाला आहे. तंत्रनिकेतनाबद्दल थोडक्यात माहिती देताना ते म्हणाले की, या ठिकाणी केमिकल इंजिनिअरींग, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रुमेंटेशन व इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम हे पदविका अभ्यासक्रम शिकवले जातात.

---

तंत्रनिकेतनाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळातर्फे व डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन व महाराष्ट्र स्टेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांची मान्यता मिळाली आहे. तंत्रनिकेतनाचे निकाल उत्तम लागत असतात व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांनी मान्यता मिळविली आहे. सिंगापूर मधील 'फिलिप्स पेट्रोलियम' व 'डुपाँईट' ह्या दोन कंपन्यांनी तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांना घेऊन त्याच्या यशाची पावती दिली आहे. भविष्यकाळाची गरज म्हणून 'इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी' हा कोर्स सुरू करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. त्याचप्रमाणे ठाणे परिसरात अभियांत्रिकी पदवी महाविद्यालय सुरू व्हावे यासाठीही प्रयत्नशील आहोत.

यानंतर मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. अ. भी. टिल्लू यांनी मंडळाच्या 'दिशा' या मासिकाबद्दल माहिती करून दिली.

यानंतर बीजभाषण वक्ते श्री. उल्हास पागे यांची उपप्राचार्य श्री. नायक यांनी ओळख करून दिली. श्री. पागे यांनी आपल्या भाषणात माहिती तंत्रज्ञान व्यवसायासंबंधी माहिती दिली. ते म्हणाले की, अग्रक्रमावर असलेल्या पाचशे अमेरिकन कंपन्यांपैकी दोनशे कंपन्या भारतीय सॉफ्टवेअर खरेदी करतात. जागतिक माहिती तंत्रज्ञान बाजारपेठेमध्ये भारताच्या योगदानाविषयी बोलताना ते म्हणाले की, १९९९ साली आय. टी. सर्व्हिस मार्केटमध्ये भारताचा वाटा ५.७ बिलियन डॉलर होता तर २००४ साली तो ३० बिलियन डॉलर पर्यंत जाईल. ज्या झपाट्याने माहिती तंत्रज्ञान उद्योग वाढत आहे त्यावरून असे दिसते की, लवकरच माहिती तंत्रज्ञान व्यवसाय हा आर्थिक विकासाचा मुख्य आधार असेल. आय. टी. इंडस्ट्रीमध्ये भक्कम पाय रोवण्यासाठी SMART मंत्राचे तंत्र अवलंबायला हवे. SMART म्हणजे S - Superior skills, M - Motivation & maturity, A - Attitudes & behavior orientation, R - Resourcefulness, T- Target & time orientation. ते म्हणाले, तुम्हाला जर SMART व्यक्ति व्हायचं असेल तर Knowledge Champion होणे जरूरी आहे.



'मिलेनियम आय.टी. प्रदर्शनाचे' WAP तंत्राचा वापर करून श्री. प्रमोद महाजन उद्घाटन करीत आहेत. सोबत अॅप्टेकचे संचालक श्री. उल्हास पागे, डॉ. बेडेकर आणि प्राचार्य मुजुमदार दिसत आहेत.

त्यानंतर प्रमुख पाहुणे माननीय श्री. प्रमोद महाजन यांच्या शुभहस्ते 'सहस्रकातील माहिती तंत्रज्ञान प्रदर्शन' या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन त्याच अभिनव तंत्राने केले गेले. बाजुला भव्य पडद्यावर प्रतिरूपाने या प्रदर्शनाचे उद्घाटन झालेले पहायला मिळाले. भारतातील पहिली WAP enable education site VPM.Synapse. अतिशय प्रगत अशा WAP म्हणजे wireless application protocol, या पद्धतीचा वापर करून झाला. यामध्ये Internet access करण्यासाठी mobile म्हणजे cellular phone चा वापर केला जातो.

प्रदर्शनाचे उद्घाटन झाल्यानंतर 'दिशा' मासिकाच्या internet च्या web site चे व 'दिशा'च्या दिवाळी अंकाचे उद्घाटन श्री. महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर डॉ. वा. ना. बेडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये श्री. प्रमोद महाजन यांचे प्रदर्शन पहाण्यास आल्याबद्दल आभार मानले. प्राचार्य श्री.

क्रोध ही दुर्बलतेची निशाणी आहे.

मुजुमदार आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक करून ते पुढे म्हणाले की, आमच्या साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यांचा अंदाज श्री. महाजन यांनी घेतला असेलच तेव्हा आम्हाला गरज भासल्यास आम्ही त्यांच्याच कडे धाव घेऊ. श्री. प्रमोद महाजन हे आपल्या व्यस्त कार्यामधून वेळ काढून आल्याबद्दल त्यांचे डॉक्टरांनी आभार मानले.




**आय. टी. प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी भाषण करीत असताना केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री माननीय श्री. प्रमोद महाजन**

त्यानंतर आजच्या युवा पिढीचे नेतृत्व करणारे माननीय श्री. प्रमोद महाजन यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात आय. टी. चे महत्त्व पटवून देतांना सांगितले की, सुरुवातीच्या काळापासून चालत आलेला दोन माणसांमधील संवादाच्या प्रगतीचा चौथा टप्पा म्हणजे माहिती तंत्रज्ञान. चित्र लिखाण आणि बोललेली भाषा ही कॉम्प्रेस करून टाकलेली जी नवी भाषा आहे ती सर्वांनी आत्मसात करणे जरूरीचे आहे. गेल्या पाच वर्षात माहिती तंत्रज्ञान विषयाने केलेली प्रगती ही अद्भूत आहे असे प्रतिपादन करून त्यांनी आपल्या चीनच्या दौऱ्या दरम्यान तिथे पहाण्यात आलेल्या एका मोबाईल फोनच्या जाहिरातीचे उदाहरण देऊन सांगितले की, सूर्याच्या २४ तासातील प्रत्येक हालचाली सामान्य माणूस टिपू शकतो इतकी असामान्य प्रगती माहिती तंत्रज्ञान विषयाने केली आहे आणि यापुढील दोन-तीन वर्षात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात गेलात तर संपर्कासाठी एकच टेलिफोन नंबर असेल. विद्यार्थी, वार्षिक परिक्षेचा पेपरही इंटरनेटवर देऊ शकेल, त्यासाठी त्या पद्धतीने प्रश्नपत्रिका काढली जाईल. स्वातंत्र्य लढ्यानंतर झालेले दुसरे महायुद्ध म्हणजे माहिती तंत्रज्ञान होय असे नमूद करून श्री. महाजन पुढे म्हणाले की, एका रात्रीत अब्जाधीश होण्याचे सामार्थ्य या माहिती तंत्रज्ञान विषयामध्ये आहे. केंद्र सरकारच्या योजनेमुळे देशात एका वर्षात १ लाख माहिती तंत्रज्ञान विषयक तज्ञ निर्माण होतात व २००५ सालापर्यंत हा आकडा ५ लाखापर्यंत जाईल अशी योजना केंद्र सरकारने आखली असल्याची माहिती श्री. महाजन यांनी दिली.

प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर त्यांना डॉ. बेडेकरांच्या हस्ते भेट वस्तू देण्यात आली. त्यानंतर तंत्रनिकेतनाच्या प्रा. सौ. शुक्ल यांनी आभाराचे भाषण केले व कार्यक्रमाची सांगता, बालकलाकार कु. ऋचा आगाशे हिने सादर केलेल्या पसायदानाने झाली.

**विद्या प्रसारक मंडळ**



**भावे व्याख्यानमालेत मंडळाचे अध्यक्ष डॉ. बेडेकर यांचेकडून पुष्पगुच्छ स्वीकारतांना प्रमुख पाहुणे श्री. मुजफ्फर हुसेन.**

दि. २४ व २५ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहामध्ये यंदाची भावे राष्ट्रीय व्याख्यान माला पार पडली. यंदा या व्याख्यान मालेचे २८ वे वर्ष होते. कैक वर्षांपासून जो भारताचा प्रांत वादातीत राहिलेला आहे आणि तो अजूनही अशांत प्रदेश म्हणूनच ओळखला जातो, ज्याची समस्या आजही पूर्वी इतकीच गंभीर आहे त्या 'काश्मीर' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी प्रसिद्ध पत्रकार श्री. मुजफ्फर हूसेन यांना आमंत्रित केले होते. दि. २४ मे रोजी श्री. हुसेन यांच्या या व्याख्यानाने, व्याख्यान मालेला सुरुवात झाली. प्रथम भौगोलिक रचना समजावून देताना त्यांनी सांगितले की, एकूण काश्मीरची व्याप्ती दोन लाख अठ्ठावीस हजार आहे. नंतर ते इतिहासाकडे वळले. सुरुवातीला मुसलमानांची या प्रदेशावर आक्रमणे होत असत. जहांगिर, शहाजहान यांच्यानंतर हा प्रदेश चाळीस वर्षे शिखांच्या ताब्यात होता आणि त्यांचा शेवटचा राजा हरीसिंग नंतर १९३२ मध्ये कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यामध्ये आंदोलने झाली आणि तेव्हाच शेख अब्दुल्ला यांचा 'नॅशनल कॉन्फरन्स' हा नवा पक्ष अस्तित्वात आला. मग १९४७ साली जेव्हा पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हा काश्मीर विभागले गेले. स्वातंत्र्यानंतरच्या काळातील पंतप्रधान व पाकिस्तानातील अधिकारी यांच्यातील करार व त्यांनी अवलंबीलेले 'काश्मीर' विषयाचे धोरण या सर्वांची माहिती मुझफ्फर हुसेन यांनी आपल्या व्याख्यानात दिली. सुरुवातीच्या काळात झालेल्या 'अखंड काश्मीर' ते अलिकडच्या काळात झालेल्या 'कारगिल चढाई' पर्यंतच्या घटनांचा आढावा त्यांनी घेतला.

दुसऱ्या दिवसाच्या म्हणजे २५ नोव्हेंबरच्या दिवशी प्रा. कु. वर्षा माळवदे यांचे, 'तरुण पिढीवर राष्ट्रीयत्वाचे संस्कार' या विषयावर व्याख्यान झाले. कु. माळवदे या मुंबई दूरदर्शनवर वृत्त निवेदिका आहेत व रामनारायण रुईया कॉलेजात अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका आहेत. उद्याचे सुसंस्कृत नागरिक होऊ घातलेली तरुण पिढी ज्या



भावे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफण्याची आदर्शवादी कामगिरी करणाऱ्या कु. वर्षा माळवदे व सोबत व्यासपीठावरील मान्यवर

उंबरठ्यावर उभी आहे त्या संस्कारांच्या पायरीच्या त्या मार्गदर्शिका असल्यामुळेच त्यांनी आवडीने हा विषय स्वीकारला होता. त्यांचं स्वत:चं तरुण वय लक्षात घेता या विषयाबाबत त्यांनी आत्मपरिक्षण करूनच या विषयाला हात घातला होता. त्या म्हणाल्या की, आज तरुण पिढीवर राष्ट्रीयत्वाचे संस्कार करण्याची वेळ तीन कारणांमुळे आली ती म्हणजे १) या पिढीला 'राष्ट्रीयत्व' आणि 'राष्ट्रवाद' हे राजकीय भावनेतून पहायला आणि अनुभवायला मिळाले आहेत. २) या पिढीने पारतंत्र्य अनुभवले नसल्यामुळे त्यांना स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य याचा अर्थच कळला नाही. ३) या पिढीला राजकीय घडी ही आखूनच मिळाली. सध्या पाश्चिमात्य संस्कृतीचा जबरदस्त पगडा या पिढीवर असल्यामुळे या पिढीवर राष्ट्रीयत्वाचे संस्कार करण्याची धुरा चार प्रमुख घटकांवर येऊन पडते. हे चार घटक म्हणजे, १) पालक, २) शिक्षण व शिक्षण संस्था, ३) समाज व ४) राजकारणी किंवा राज्यकर्ते. हल्लीची तरुण मंडळी उच्चशिक्षण घेऊन मोठ्या प्रमाणावर परदेशी जात असल्याचे नमूद करून खेद व्यक्त करताना त्या म्हणाल्या की, आपल्या देशात Brain drain होत असून ज्या व्यक्तीसाठी आपल्या देशाने, आपल्या समाजाने, आपल्या कुटुंबाने लाखो रुपये

खर्च केले आहेत त्या विद्यार्थ्याने परदेशी 'इंटेलिजन्स पूला'चे धनी का व्हावे. त्यांनी अर्थप्राप्तीनंतर पुन्हा आपल्या देशाकडे परत फिरावे असे त्यांनी मत स्पष्ट केले. आणि यासाठी या तरुण पिढीवर राष्ट्र, राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रवाद या तीनही गोष्टी भिन्न नसून एकच आहेत हे बिंबविले पाहिजे. ओघवत्या स्पष्ट वाणीतून नेमक्या वेळात दिलेले व्याख्यान अतिशय रंगतदार झाले.

दोन्ही दिवसांचे सूत्र संचालन श्री. रविंद्र मांजरेकर व श्री. मोहन पाठक यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. बेडेकर यांनी सांगितले की, आजच्या तरुण पिढीने जरूर परदेशात जावे, ज्ञान व पैसा मिळवावा व भारतात येऊन एखाद्या रम्य ठिकाणी घर व जमीन जुमला घेऊन पुढील आयुष्याची तरतूद करून ठेवावी पण आपल्या मायभूमीला कधीही विसरू नये.

## आनंदीबाई केशव जोशी इं. मि. स्कूल

दि. १४ नोव्हेंबर २००० या दिवशी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'वर्षा माळवदे' यांची माधव चिरमुले यांनी मुलाखत घेतली. वर्षा माळवदे या रुईया कॉलेज येथे इकॉनॉमिक्सच्या प्राध्यापिका असून आय.ए.एस. परीक्षेचा अभ्यास त्यांनी केलेला आहे. सध्या त्या दूरदर्शनवर मराठी वृत्तनिवेदनाचे कामही करतात. चिरमुले यांनी घेतलेली ही मुलाखत अतिशय रंगतदार झाली. वर्षा माळवदे यांनी आय.ए.एस. परीक्षांबद्दल मुलांना बहुमोल माहिती दिली. तसेच त्यांनी सांगितलेले आपल्या वृत्तनिवेदिकेच्या कामातील अनुभवही मुलांना मार्गदर्शक होते. शेवटी मुलांच्या विविध कुतुहलपूर्ण प्रश्नांना वर्षा माळवदे यांनी हसतखेळत उत्तरे दिली.

दि. २७ नोव्हेंबर रोजी कुमार कला केंद्र, मुंबई तर्फे आयोजित आंतरशालेय बालनाट्य स्पर्धेत शाळेच्या माध्यमिक विभागातर्फे 'अनमोल नजराणा' ही एकांकिका सादर करण्यात आली. एकांकिकेचे लेखन विशाखा देशपांडे यांनी केले होते तर दिग्दर्शन प्रियांका भागले यांनी केले होते. अर्पणा भोळे व वीणा जोशी यांनी विशेष मार्गदर्शन केले. श्री. संजय बोरकर यांच्या नेपथ्य व प्रकाश योजनेने नाटकाच्या सादरीकरणामध्ये विशेष उठाव आला. अजिंक्य काळे, प्रांजली वागळे, आकृती माहिमकर यांना अभिनयासाठी प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. त्याच संस्थेने आयोजित केलेल्या आंतरशालेय लोकनृत्य स्पर्धेतही माध्यमिक विभागाने भाग घेऊन 'आसामी कुकी लोकनृत्य' सादर केले. या नृत्याचं दिग्दर्शन शर्मिला नाबर व नीता शरदा या शिक्षिकांनी केले होते. यामध्ये विशेष नैपुण्यासाठी दर्शिल निशार, दिनेश गाला, निकिता बोरीचा, लीना सतरा व रुची साठे या विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रके मिळाली. या दोन्ही स्पर्धांचे अंतिम निकाल अद्याप जाहिर करण्यात आलेले नाहीत.

इ. ९ वीचे स्काऊटस् व गाईडस् दि. २१ ते २३ नोव्हेंबर रोजी 'ग्राममंगल' ऐने, ता. डहाणू येथे शिबीरासाठी गेले होते. हे शिबीर अनेक अर्थांनी संस्मरणीय ठरले. या शिबीरात विद्यार्थ्यांनी स्काऊटींग व गाईडींगमधील अनेक प्रात्यक्षिके तर अनुभवलीच, पण त्याचबरोबर ऐने परिसरातील अनेक आदिवासींच्या पाड्यांवर जाऊन तेथील लोकांचे जीवन समजावून घेण्याचा प्रयत्न केला. तेथील आदिवासी शाळांनाही मुलांनी भेट दिली. या आदिवासी मुलांनी आपल्या विद्यार्थ्यांसमोर त्यांचे प्रसिद्ध 'तारपा' नृत्य सादर केले. 'ग्राममंगल' या संस्थेची कार्यपद्धतीही मुलांनी समजावून घेतली. दोन दिवसांच्या या शिबीर कालावधीत मुलांनी श्रमदानाचा आनंदही लुटला. अखेर शिबीराच्या समारोपात आदिवासी मुलांशी पत्रमैत्री करण्याचा व भविष्यात आपण या लोकांसाठी जमेल त्या प्रकारे सहाय्य करण्याचा निर्धार करूनच शिबीरार्थी ठाण्याला परतले.

'नॅशनल सायन्स कॉंग्रेस फॉर चिल्ड्रन' या संस्थेतर्फे जिल्हा पातळीवर घेण्यात आलेल्या विज्ञान प्रयोगाकरीता आमच्या विद्यार्थ्यांनी 'हायड्रोपोनिक्स' हा प्रयोग सादर

केला व सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेकरता ५६ प्रयोगांपैकी १२ प्रयोग निवडण्यात आले. त्या १२ मध्ये आमच्या शाळेच्या प्रयोगाची निवड करण्यात आली हे अभिमानास्पद गोष्ट आहे. या प्रयोगामध्ये भाग घेतलेले विद्यार्थी आहेत निखिल सूर्यनारायण, स्वप्नील घोडगे, अमेय वोरवणकर व सौरभ जामखिंडीकर. या विद्यार्थ्यांना, पूर्णिमा साळे व नमिता जोशी या शिक्षिकांनी मार्गदर्शन केले. राज्यस्तरीय स्पर्धेचे निकाल अद्याप जाहिर झालेले नाहीत.



चिन्मय आघारकर

इ. ४ थी चा चिन्मय आघारकर याने नाशिक येथे झालेल्या लॉन टेनिस स्पर्धेमध्ये भाग घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात ५ वा क्रमांक मिळवला आहे. त्याचे हार्दिक अभिनंदन !

'राष्ट्रीय प्रज्ञा शोध' परीक्षेमध्ये यावर्षी नचिकेत थोरात, हिमांशू देशपांडे, दिनेश अय्यर या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे.

या सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

### डॉ. बेडेकर विद्या मंदिर - प्राथमिक विभाग

सौ. विनोदिनी राणे यांनी कळवल्यानुसार ह्या वर्षी प्रथमच एक वेगळा उपक्रम विभागाच्या मुख्याध्यापिका अनुराधा मळेकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला तो म्हणजे विद्यार्थ्यांची 'हस्तलिखिते'. इयत्तेनुसार शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक तुकडीतील विद्यार्थ्यांच्या मदतीने हस्तलिखिते तयार करण्यात आली.

१४ नोव्हेंबर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन, सर्वत्र 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो. डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभागातही हा दिवस साजरा केला परंतु थोड्या वेगळ्या स्वरूपात. विद्यार्थ्यांच्या हस्तलिखितांचा 'प्रकाशन सोहळा' हा कार्यक्रम आयोजित करून.

वरील कार्यक्रम मंगळवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला. सकाळच्या विभागातील हस्तलिखिताच्या प्रकाशन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष, माननीय श्री. टिळू साहेब उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते इ. ३ री चे 'माणसाची गोष्ट' व इ. ४ थी चे 'अष्टपैलू शिवराय' ह्या दोन हस्तलिखितांचे प्रकाशन करण्यात आले. श्री. टिळू साहेबांनी ह्या उपक्रमाबद्दल त्यांना झालेला आनंद व्यक्त केला. तसेच ह्या वर्षीप्रमाणे दरवर्षी 'हस्तलिखित' तयार करून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्याबद्दल सांगितले. कार्यक्रमात चाचा नेहरूंच्या जीवनावर आधारित भाषणे काही विद्यार्थ्यांनी केली. तसेच सन २००० साली सर्व तुकड्यातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे वाटण्यात आली.



श्रीमती पंडितराव बाई १ ली व २ री च्या 'बालजगत' हस्तलिखिताचे प्रकाशन करताना. सोबत सौ. नलिनी जोशीबाई माजी मुख्याध्यापिका. (१४ नोव्हें. २०००)

विज्ञानाचा प्रवास हा सत्याच्या दिशेने चाललेला प्रवास आहे.

दुपार विभागातर्फे हस्तलिखिताच्या प्रकाशन सोहळ्यास शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. नलिनी जोशीबाई व प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती पंडितरावबाई उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते इ. १ ली, २री चे मिळून असलेले हस्तलिखित 'बालजगत' याचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी चाचा नेहरूंबद्दल छोट्या गोष्टी सांगितल्या. तसेच सन २००० साली सर्व तुकड्यांतून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीसाचे वितरण करण्यात आले.

याबरोबरच दरवर्षीप्रमाणे बालदिनानिमित्त इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची 'निबंध स्पर्धा' व इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांची 'भेटकार्ड स्पर्धा' आयोजित करण्यात आली.

मंगळवार दि. २८ नोव्हेंबर २००० रोजी, कुमार कला केंद्रातर्फे आयोजितआंतर शालेय नाट्य स्पर्धेत इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी 'आपण सारे एक' हे नाटक सादर केले.

नाटकाचे दिग्दर्शन सौ. विजया भंडारे यांनी केले होते. नाटकास विशेष मार्गदर्शन विभागाच्या मुख्याध्यापिका अनुराधा मळेकर यांचे लाभले होते. नाटकातील उत्तम अभिनयाबद्दल पुढील विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले - नचिकेत बुराडे, अजिंक्य शिरिष जोशी, अजिंक्य सुरेंद्र जोशी, मानसी जावळे.

प्राथमिक विभागातील इ. ४ थी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी कुमार मयुर प्रशांत वर्मा याला ठाणे महानगरपालिकेतर्फे, ठाणे महानगरपालिकेच्या १८ व्यावर्धापनानिमित्त आयोजित करण्यात आललेल्या विशेष कार्यक्रमात 'जागतिक कुवाटो कप कराटे' स्पर्धेत प्राविण्य मिळवल्याबद्दल 'ठाणे गुणीजन' या सन्मानाने गौरविण्यात आले.

हा विशेष कार्यक्रम बुधवार दि. १८ ऑक्टोबर २००० रोजी गडकरी रंगायतन, ठाणे येथे संपन्न झाला. कुमार मयुर याला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, महाराष्ट्र शासनाच्या विधान परिषदेतील उपसभापती, माननीय श्री. वसंतरावजी डावखरे यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

तसेच ठाणे शहरात गेली ८९ वर्षे कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेली संस्था श्री. आनंद भारती समाज. या संस्थेद्वारे आयोजित शनिवार, दि. ७ ऑक्टोबर २००० रोजी झालेल्या 'दसरा संमेलनात' कुमार मयुर वर्मा यास कराटे स्पर्धेतील प्राविण्याबद्दल, समाजाचे अध्यक्ष मा. श्री. प्रभाकर कोळी यांच्या शुभहस्ते विशेष पारितोषिक देण्यात आले.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)**

१६ नोव्हेंबर २००० रोजी विज्ञान शिक्षण मंडळातर्फे प्रकल्प सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत आपल्या शाळेतील इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांचा 'लहान वयात मुलांना चष्मा का लागतो?' हा प्रकल्प जिल्हा पातळीवरील स्पर्धेसाठी निवडला गेला आहे. या प्रकल्पासाठी वैभव पाटील (८ 'अ') याने गटप्रमुख म्हणून काम पाहिले. या प्रकल्पातील इतर सहभागी विद्यार्थी पुढीलप्रमाणे - शंकर साटम, नीलेश गोवेकर, आलोक वैद्य, निमिष देशपांडे. या विद्यार्थ्यांना सौ. अंजली पंडित व सौ. वंदना अडसुळे यांनी मार्गदर्शन केले.

कुमार कला केंद्रातर्फे विविध गुणदर्शन स्पर्धा घेण्यात आल्या. त्यातील चित्रकला, हस्ताक्षर, भेटकार्ड या स्पर्धांचे निकाल नुकतेच प्राप्त झाले. शिक्षक विभागात आपल्या शाळेतील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांना चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धेत सर्वप्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले तसेच कलाशिक्षक श्री. वासुदेव वैद्य यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. इतर निकाल

गेलेल्या संधीबद्दल रडत बसण्यापेक्षा येणाऱ्या संधीचे स्वागत करा.

पुढील प्रमाणे :-

- चित्रकला - अमेय चरणकर, महेश मोरे, प्रतिक सुरवसे, सायली श्रोत्री, गणेश पडवेकर.
- हस्ताक्षर - स्वप्ना गोरे, अनुश्री गोडबोले, प्रज्ञा दर्णे.
- भेटकार्ड - रिमा मेंगळे, निवेदिता खंडागळे, नेहा हिंदळेकर, स्नेहल धावडे, गौरव टावरे.

क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या विद्यमाने प्रवरानगर येथे आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेत प्रचिता पाटणकर (८ 'ब') हिला लांब उडी व उंच उडी या खेळात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

पुणे येथे नोव्हेंबर २००० मध्ये राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत आपल्या शाळेतील शशांक शिरीष केतकर (१० 'ब') यास १०० मी. बॅकस्ट्रोक व २०० मी. बॅकस्ट्रोक या दोन्ही प्रकारात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले व राष्ट्रपातळीवरील स्पर्धेसाठी त्याची निवड झाली.

राष्ट्रपातळीवरील जलतरण स्पर्धा गोहाटी येथे झाल्या. त्यात संपूर्ण भारतातून आलेल्या ३२ विद्यार्थ्यांमध्ये शशांक केतकर (१० 'ब') याचा ७ वा क्रमांक लागला.

कुमार कला केंद्रातर्फे आंतरशालेय एकांकिका स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत आपल्या शाळेतील शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. शिक्षक विभागात कु. साधना कारंडे व श्री. वझे यांना उत्कृष्ट अभिनयाची प्रशस्तीपत्रके प्राप्त झाली. विद्यार्थी विभागात कु. दुर्गेश देशपांडे, कु. प्रज्ञा नामजोशी, रोहन शास्त्री, रेश्मा चिटणीस ह्यांना वैयक्तिक अभिनयाची प्रशस्तीपत्रके देण्यात आली.

कुमार कला केंद्रातर्फे झालेल्या लोकनृत्य स्पर्धेत विद्यार्थी गटात पुढील विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात आली - १) अनुजा देशपांडे, २) मनाली देशमुख (७ अ), ३) कमलेश जाधव (६ बी), ४) संपदा चितळे (६ अ), ५) गायत्री कोलते (७ बी).

गाणारे आठ कलाकार '७ अ' मधील होते. सर्वांना प्रशस्तीपत्रके मिळाली.

नृत्याच्या दिग्दर्शनाचे प्रशस्तीपत्रक शिक्षिका कु. कारंडे व सौ. धोत्रे ह्यांना मिळाले.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन !

**तंत्रनिकेतन**

१८ नोव्हेंबर २००० रोजी ISTE तर्फे डॉ. सौ. शीला शहा यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात 'अॅक्युप्रेशर व आयुर्वेदिक औषधे' याबाबत व्याख्यान दिले. त्यांच्यासोबत कु. नेत्रा बी. नागेश यांनी आयुर्वेदिक औषधांची माहिती दिली. हा कार्यक्रम एकदम आगळा वेगळा झाला. त्यांनी माहितीही सविस्तर व सोप्या पद्धतीने विशद केली. त्यामुळे सर्वांना हा कार्यक्रम आवडला.

त्यांनी आजारावर काही घरगुती उपाय करता येण्यासारखे आहेत तेही सांगितले. प्रा. सौ. गीताली इंगवले यांनी हा कार्यक्रम सादर केला. प्रास्ताविकामध्ये त्यांनी डॉ. सौ शहा यांचा थोडक्यात परिचय करून दिला.



डॉ. सौ. शीला शहा, प्राचार्य श्री. मुजुमदार

प्राचार्य सी. श्री. मुजुमदार यांनी डॉ. सौ. शहांनी उपयोगी व सोप्या पद्धतीच्या उपचारांची माहिती दिली याबद्दल त्यांचे आभार मानले.

तसेच प्रा. सौ. किर्ती आगाशे यांनी पाहुण्यांचे आभार मानले व हा छोटेखानी कार्यक्रम संपला. कार्यक्रमानंतर त्यांनी काही आयुर्वेदीक औषधांची विक्रीही केली.

२७ सप्टेंबर २००० रोजी 'ISTE student chapter V.P.M's Polytechnic' २०००-२००१ चे उद्घाटन माननीय पाहुणे श्री ऐ. सी. मेहता (एस. बी. एम. पी. कॉलेजचे प्राचार्य) ह्यांच्या शुभहस्ते झाले.



श्री. ऐ. सी. मेहता, ISTE

संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: आयोजित केला हे ह्या कार्यक्रमाचे वैशिष्ठ. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. T.Y.I.S. च्या सचीन सालेकर ह्याने I.S.T.E. ची माहिती विस्तृत प्रमाणात दिली. नंतर माननीय पाहुणे श्रीयुत ऐ.सी. मेहता ह्यांनी I.S.T.E., I.S.T.E. Student Chapter विषयी तसेच ह्यामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील जीवनात होणारे फायदे व 'मास्टर स्टुडंट' होण्यासाठी लागणाऱ्या गुणवत्ता ह्याविषयी सविस्तर भाषण केले. त्यानंतर F.Y.I.E.च्या देवदत्त जोशी ह्याने त्यांच्या राष्ट्रीय पारितोषिक विजेत्या लेखाविषयी (गणपती विसर्जनाच्या मुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी) विस्तृत सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. मुजुमदार ह्यांनी I.S.T.E. चा अहवाल सादर केला. ह्या कार्यक्रमाचा आनंद विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने द्विगुणीत झाला.

५ ऑक्टोबर २००० रोजी 'ISTE Chapter V.P.M's Polytechnic' २०००-२००१ चे उद्घाटन माननीय पाहुणे श्री. सी. वाय. मोवाडे (महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षणाचे कार्याध्यक्ष) ह्यांच्या शुभहस्ते झाले. 'Model institute' ह्याविषयी त्यांनी दिलेले भाषण फारच मोलाचे होते. त्यांनी सांगितले की, V.P.M. Polytechnic ही यशस्वी संस्था आहे कारण तिच्यात असलेली कार्यकुशल प्राध्यापक, कामाला वाहून घेतलेला कर्मचारी वर्ग, त्याचबरोबर ग्रंथालयातील विविध पुस्तके ह्यामुळेच इथून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पुष्कळ आहे. V.P.M. चा उल्लेख त्यांनी 'Model institute' म्हणून केला. 'Chemical Engineering & Chemical Technology' ह्या विषयांबाबत V.P.M. Polytechnic चा सहभाग ह्या विषयाचा उल्लेख केला. सी. इंगवले (I.S.T.E. Socretory) ह्यांनी २०००-२००१ ह्या दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमांची रुपरेषा या कार्यक्रमात दिली.



श्री. चंद्रकांत मोवाडे व प्राचार्य सी. श्री. मुजुमदार

ह्या कार्यक्रमाला विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्री. वा. ना. बेडेकर, विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर आणि कार्याध्यक्ष श्री. टिल्लू हे ही उपस्थित होते.

प्रत्येक घरातील तरुणानं सैनिकी शिक्षण घेतलंच पाहिजे.